cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–४३ | शुक्रवार दि.१ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### एक मे : ओळख, अभिमान आणि हक्कांची नव्याने लढाई

एक मे हा दिवस महाराष्ट्रासाठी केवळ राज्य स्थापनेचा स्मरणदिन नाही, तर तो अस्मिता, संघर्ष आणि स्वाभिमानाचा जिवंत दस्तऐवज आहे. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या प्रदीर्घ आणि त्यागमय लढ्यानंतर महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. भाषिक आधारावर राज्य पुनर्रचनेच्या मागणीसाठी हजारो कार्यकर्त्यांनी दिलेला लढा, हुतात्म्यांचे बलिदान आणि जनतेचा अढळ निर्धार यामुळे 'मराठी माणसाचा' स्वतंत्र राज्याचा स्वप्न साकार झाले.




# फार्मर आयडीशिवाय खत खरेदी कठीण!

## रेशनिंगची अंमलबजावणी सुरू; खत तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर मोठा निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे खतांच्या पुरवठ्यावर ताण वाढला असून, शेतकऱ्यांना वेळेत आणि योग्य प्रमाणात खत मिळावे यासाठी कृषी विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. खतांचा तुटवडा लक्षात घेता आता खतांचे रेशनिंग करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असून, त्यासाठी ॲग्रीस्टॅक योजनेतील शेतकरी ओळख क्रमांक बंधनकारक करण्यात आला आहे.**



कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, खतांच्या विक्रीवर नियंत्रण आणणे आणि अवाजवी खरेदी रोखणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. मात्र, राज्यातील सुमारे ३० लाख शेतकऱ्यांकडे अद्याप ओळख क्रमांक उपलब्ध नसल्याने, ही अट सुरुवातीला कठोरपणे लागू केली जाणार नाही. तरीदेखील, शेतकऱ्यांनी २० मेपूर्वी ॲग्रीस्टॅक ओळख क्रमांक काढून घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सध्याच्या परिस्थितीत आंतरराष्ट्रीय स्तरावर तणाव वाढल्यामुळे खतांच्या आयातीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे केंद्र सरकारला दुप्पट दराने खत खरेदी करावी लागत आहे. यामुळे बाजारात कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये आणि साठेबाजीला आळा बसावा, यासाठी राज्य सरकारने नियंत्रणात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. खत विक्रीत होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी कृषी विभागाने फिरती पथके नेमली असून, अनेक विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली आहे. तपासणीत काही शेतकरी गरजेपेक्षा जास्त खत खरेदी करत असल्याचेही समोर आले आहे. यामुळे खरी गरज असलेल्या शेतकऱ्यांना खत मिळण्यात अडचणी निर्माण होत होत्या. आता खत खरेदीसाठी केवळ ओळख क्रमांकच नव्हे, तर पिकांची नोंदणी करणेही आवश्यक असणार आहे. शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक पोर्टलवर आपल्या शेती क्षेत्राची आणि लागवड केलेल्या पिकांची माहिती नोंदवावी लागेल. ▶▶ पान २ वर

### ॲग्रीस्टॅक योजना काय?

राज्यात १४ नोव्हेंबर २०२४ पासून ॲग्रीस्टॅक योजनेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याला एक युनिक ओळख क्रमांक दिला जातो. या क्रमांकाद्वारे शेतकऱ्याची जमीन, पिकांची माहिती आणि इतर कृषी संबंधित तपशील डिजिटल स्वरूपात नोंदवले जातात.

## बच्चू कडूंचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश, विधानपरिषदेसाठी उमेदवारी जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

**प्रहार जनशक्तीचे प्रमुख आणि माजी आमदार बच्चू कडू यांनी गुरुवारी (दि. ३० एप्रिल) मुंबईत त्यांच्या कार्यकर्त्यांसह शिंदेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत कडू यांनी शिवसेनेच्या प्राथमिक सदस्यत्वाचा अर्ज भरून धनुष्यबाण हाती घेतला. त्यानंतर शिंदे यांनी लगेच विधानपरिषदेसाठी शिवसेनेचे अधिकृत उमेदवार म्हणून बच्चू कडू यांच्या नावाची घोषणा केली.**

निव्वळ आमदारकीसाठी नव्हे तर दिव्यांग आणि शेतकऱ्यांच्या मुद्यांवर चर्चा केल्यानंतरच शिवसेनेत प्रवेश करण्याचा



निर्णय घेतला असल्याचे बच्चू कडू यांनी यावेळी स्पष्ट केले. जिथे आहे, तिथे प्रामाणिकपणे तेवढ्याच ताकदीने राजकारणात आमचा प्रवास शिंदेंच्या नेतृत्वात राहील. शिंदेंचा स्वभाव सेवाभावी आहे. रात्री दोन वाजता सुद्धा वर्षा बंगल्याची दारे खुली होती. त्यांनी दिव्यांग मंत्रालय स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्यांनी कर्जमाफीच्या निर्णयात ▶▶ पान २ वर

## टीएमसी कार्यकर्त्यांचे मनोधैर्य खच्ची करण्यासाठीच एक्झिट पोल

### भाजपला झुकते माप देणारे एक्झिट पोल ममता बॅनर्जींनी फेटाळले

**कोलकाता । प्रतिनिधी**

भाजपला फायदा दाखवणारे एक्झिट पोल हा टीएमसी कार्यकर्त्यांचे मनोधैर्य खच्ची करण्यासाठी रचलेला राजकीय डाव असल्याचा आरोप ममता बॅनर्जी केला. आम्ही २२६ चा आकडा पार करणार आहोत हे त्यांना ठाऊक आहे. भाजपला हे माहीत आहे की ते टीएमसीचा वेग रोखू शकत नाहीत, असेही त्यांनी नमूद केले. कार्यकर्त्यांना सूचना देताना त्या म्हणाल्या, दिवसा कार्यकर्त्यांना कर्तव्यावर ठेवा, पण रात्रीची जबाबदारी तुम्ही स्वतः



सांभाळा. पहारा द्या. जर मी पहारा देऊ शकते, तर तुम्हीही देऊ शकता. रात्रभर जागे राहा आणि सकाळी पुढच्या टीमकडे जबाबदारी सोपवल्यानंतरच विश्रांती घ्या, असे त्या म्हणाल्या.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपला आघाडी दर्शवणारे सर्व एक्झिट पोलचे अंदाज फेटाळून लावले आहेत. आपली तृणमूल काँग्रेस पार्टी २२६ पेक्षा जास्त जागा जिंकून सहज बहुमताचा टप्पा पार करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. बहुतेक एक्झिट पोलमध्ये पश्चिम बंगालमध्ये भाजपला कौल मिळत असल्याचे पाहून, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी गुरूवारी (दि. ३० एप्रिल) आपल्या कार्यकर्त्यांना ४ मे रोजीच्या निकाल दिवशी मतमोजणी केंद्रांवर चोवीस तास पहारा देण्याचे आवाहन केले. पोलस्टर्सचे अंदाज फेटाळून लावताना ▶▶ पान २ वर

## महाराष्ट्रात एस्सी आरक्षणाचे स्वरुप बदलणार

### दलित समाजाला फटका? समितीकडून सरकारकडे महत्त्वाची शिफारस

**मुंबई । प्रतिनिधी**

अनुसूचित जातीच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याच्या मागणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या न्या. बदर समितीचा अहवाल राज्य मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात आला असून, या उपवर्गीकरणाचा फटका अनुसूचित जातीतील एका समाजाला बसण्याची शक्यता आहे. या अहवालानुसार मांग-मातंग हा समाज अद्याप मागासच असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

सन २०११ मध्ये करण्यात आलेल्या जनगणनेच्या आधारे ही पाहणी करण्यात आली. उपवर्गीकरण





करताना एखाद्या गटातील प्रगत व मागास जाती कोणत्या याचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, भविष्यामध्ये त्यानुसार आरक्षणाचा लाभ देण्याची शिफारस करण्यात येणार आहे. बदर समितीच्या निकषांनुसार या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये घेतलेल्या प्रवेशांच्या संख्येचा विचार करण्यात येणार असल्याचे समजते. अनुसूचित जातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्यासाठी राज्य सरकारने न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर (निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय, पाटणा) यांच्या अध्यक्षतेखालील एकसदस्यीय समिती स्थापन केली होती. समितीने शिफारशींसह १६ मार्च २०२६ रोजी अहवाल सरकारला सादर केला होता. दरम्यान, राज्य सरकारने जनतेकडून सूचना आणि हरकती मागविल्या होत्या ज्याची गुरुवारी अखेरची मुदत होती. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत ▶▶ पान २ वर

## राज्यात आज नवीन बारा डायलिसीस केंद्रांचे लोकार्पण

### किडनी विकारग्रस्तांना दिलासा, मराठवाड्यातून केजचा समावेश

**मुंबई । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील किडनी विकारग्रस्त रुग्णांना शासकीय दवाखान्यात मोफत डायलिसीस सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या ''महाडायलिसीस'' योजनेचा राज्यात महाराष्ट्र दिनी विस्तार करण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते १ मे रोजी नवीन बारा डायलिसीस केंद्राचे लोकार्पण दूरदृश्य प्रणालीद्वारे



करण्यात येणार आहे.

राज्यातील किडनी विकारग्रस्त नागरिकांना मोफत डायलिसीस सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'महाडायलिसीस' योजना सध्या विविध शासकीय रुग्णालयांत प्रभावीपणे ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### डीजे च्या आवाजामुळे १४० कोंबड्या दगावल्या

लखनौः उत्तर प्रदेशच्या सुलतानपूर जिल्ह्यातील एका पोल्ट्री फार्म मालकाने असा आरोप केला आहे की, फार्मच्या जवळून जाणाऱ्या लग्नाच्या वरातीमध्ये वाजवल्या गेलेल्या मोठ्या आवाजाच्या डीजेमुळे त्याच्या १४० कोंबड्यांचा मृत्यू झाला आहे. बल्दीराय पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दरियापूर गावात रात्रीच्या वेळी वरातीत डीजे सिस्टीमवर मोठ्या आवाजात गाणी लावली होती. तक्रारदार साबीर अली यांनी सांगितले की, रात्री साडेनऊच्या सुमारास ही वरात त्यांच्या फार्मच्या अगदी समोरून गेली. यावेळी डीजेचा आवाज इतका तीव्र आणि कानठळ्या बसवणारा होता की, त्यामुळे कोंबड्यांमध्ये प्रचंड घबराट पसरली. कोंबड्या घाबरल्या आणि त्यांचा मृत्यू झाला. या आर्थिक नुकसानीसाठी त्यांनी डीजेच्या आवाजाला जबाबदार धरले आहे. बल्दीराय पोलिसांनी डीजे चालक कवी यादव याच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम २७० (लोक उपद्रव) आणि ३२५ (प्राण्यांना मारून किंवा विष देऊन केलेले नुकसान) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तज्ज्ञांच्या मते, उच्च तीव्रतेच्या ध्वनी लहरींमुळे पक्षी आणि प्राण्यांमध्ये तीव्र तणाव निर्माण होऊ शकतो. यामुळे त्यांना हृदयविकाराचा झटका किंवा शॉक बसून मृत्यू ओढवू शकतो.

### बंगळूरूमध्ये पावसाचा हाहाकार; ७ जणांचा मृत्यू

बंगळुरूः कर्नाटकची राजधानी बेंगळुरूमध्ये बुधवारी रात्री मुसळधार पावसाने हाहाकार माजवला. सोसाट्याच्या वाऱ्यासह मेघगर्जना आणि गारपीट होत असल्याने शहरातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. पावसामुळे शिवाजीनगर येथील ऐतिहासिक बोरिंग आणि लेडी कर्झन रुग्णालयच्या कंपाऊंड भिंतीचा एक मोठा भाग अचानक कोसळल्याची भीषण दुर्घटना घडली. या अपघातात ७ जणांचा जागीच मृत्यू झाला असून, ७ जण जखमी झाले आहेत. मुसळधार पावसाने शहरात हाहाकार माजवला. रस्त्यावरील दुकानदार, वाटसरू आणि काही मुले पावसापासून बचावण्यासाठी रुग्णालयाच्या भिंतीजवळ आश्रय घेत होते. त्याचवेळी भिंत कोसळल्याने तेथे उभे असलेले लोक ढिगाऱ्याखाली दबले गेले. मृतांमध्ये एक ६ वर्षीय मुलगी, दोन महिला (त्यापैकी दोन केरळमधील), चार पुरुष यांचा समावेश आहे.

### सुट्टीची सूचना

जागतीक कामगार दिनानिमित्त आज दि.१ मे रोजी दै. राज्य लोकतंत्र कार्यालयास सुट्टी असल्याने, उद्या दि.२ मे रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, वार्ताहर, वितरक, यांनी नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२९ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७३.५० क्विंटल | २,००० | २,७७० | २,३७१ |
| ज्वारी/हायब्रिड: ७४.०० क्विंटल | १,७०० | ३,२६१ | २,१८९ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ८.५० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ५९.०० क्विंटल | १,८०० | २,८२५ | २,३४० |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ४,९०१ | ५,१९० | ५,०४७ |



## आजपासून एलपीजी सिलेंडरच्या नियमांमध्ये बदल

**नवीदिल्ली । वृतसंस्था**

आज पासून म्हणजेच १ मे पासून गॅस बुकिंगशी संबंधित अनेक बदल लागू होण्याची शक्यता आहे. या नियमांनुसार, ओटीपी-आधारित डिलिव्हरी अनिवार्य असेल आणि उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी ई-केवायसी अनिवार्य करण्यात आले आहे. याशिवाय, जागतिक तणावामुळे एलपीजीच्या दरात झालेल्या वाढीनंतर, मे महिन्यापासून आणखी बदल होण्याची शक्यता आहे.

घरांपासून ते मोठ्या हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सपर्यंत सर्वत्र एलपीजीचा वापर केला जातो. मध्य पूर्वेतील तणावामुळे एप्रिल महिन्यात अनेकांना एलपीजीच्या तुटवड्याचा सामना करावा लागला. आता, १ मे पासून एलपीजीशी संबंधित अनेक बदल लागू केले जातील, ज्यामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. एलपीजी बुकिंगपासून ते दरांपर्यंत सर्व गोष्टींशी संबंधित नियम ▶▶ पान २ वर




cmyk

## अग्रलेख

# एक मे : ओळख, अभिमान आणि हक्कांची नव्याने लढाई

एक मे हा दिवस महाराष्ट्रासाठी केवळ राज्य स्थापनेचा स्मरणदिन नाही, तर तो अस्मिता, संघर्ष आणि स्वाभिमानाचा जिवंत दस्तऐवज आहे. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या प्रदीर्घ आणि त्यागमय लढ्यानंतर महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. भाषिक आधारावर राज्य पुनर्रचनेच्या मागणीसाठी हजारो कार्यकर्त्यांनी दिलेला लढा, हुतात्म्यांचे बलिदान आणि जनतेचा अढळ निर्धार यामुळे 'मराठी माणसाचा' स्वतंत्र राज्याचा स्वप्न साकार झाले. त्यामुळे महाराष्ट्र दिन हा केवळ उत्सव नसून इतिहासाची जाणीव आणि कर्तव्याची आठवण करून देणारा दिवस आहे. याच दिवशी जगभर 'जागतिक कामगार दिन' साजरा केला जातो. कामगारांच्या हक्कांसाठी झालेल्या संघर्षाची, विशेषतः आठ तासांच्या कामाच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याची ही आठवण आहे. या दोन घटनांचा एकत्र येणारा हा दिवस आपल्याला सांगतो की राज्यनिर्मिती असो वा कामगार हक्कांची लढाई दोन्हींचा पाया हा सामान्य माणसाच्या संघर्षातच आहे.

आजच्या परिस्थितीकडे पाहिले, तर महाराष्ट्राने औद्योगिक, शैक्षणिक, कृषी आणि सेवा क्षेत्रात मोठी प्रगती साधली आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी बनली, पुणे हे शिक्षण आणि आयटी क्षेत्राचे केंद्र म्हणून उदयास आले, तर नाशिक, नागपूर, औरंगाबाद यांसारखी शहरे औद्योगिक विकासाची नवी केंद्रे ठरली. परंतु या विकासाच्या चित्राला दुसरी बाजूही आहे. प्रादेशिक असमतोल अजूनही ठळकपणे जाणवतो. विदर्भ आणि मराठवाड्यातील दुष्काळ, शेतकरी आत्महत्या, अपुरी पायाभूत सुविधा आणि रोजगाराच्या मर्यादित संधी ही वास्तवता नाकारता येत नाही. महाराष्ट्र दिन साजरा करताना या विषमतेकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही. 'सर्वसमावेशक विकास' ही केवळ घोषवाक्य न राहता ती प्रत्यक्षात उतरवण्याची जबाबदारी शासनासोबतच समाजावरही आहे. ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी वाढविल्याशिवाय महाराष्ट्राचा विकास पूर्ण होणार नाही. जागतिक कामगार दिनाच्या पार्श्वभूमीवर पाहिले, तर आजचा कामगार पारंपरिक चौकटीबाहेर गेला आहे. औद्योगिक क्षेत्रातील संघटित कामगारांबरोबरच असंघटित क्षेत्रातील, कंत्राटी पद्धतीवर काम करणारे, घरगुती कामगार, बांधकाम मजूर, तसेच ॲप-आधारित सेवांमध्ये कार्यरत असलेले 'गिग वर्कर्स' ही मोठी कामगारांची फळी निर्माण झाली आहे. या नव्या अर्थव्यवस्थेत रोजगाराच्या संधी वाढल्या असल्या, तरी त्यात सुरक्षिततेचा आणि स्थैर्याचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. कंत्राटी पद्धतीमुळे नोकरीची हमी कमी झाली आहे, तर सामाजिक सुरक्षा, निवृत्ती वेतन, आरोग्य सुविधा यांचा अभाव अनेक कामगारांना भेडसावत आहे. कामगार कायद्यांमध्ये झालेले बदल हे उद्योगसुलभतेच्या दृष्टीने आवश्यक असले, तरी त्याचा परिणाम कामगारांच्या हक्कांवर होऊ नये, याची दक्षता घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. अन्यथा 'विकास' हा शब्द केवळ आकडेवारीपुरता मर्यादित राहील.

कोविड-१९ महामारीने कामगारांच्या प्रश्नांना अधिकच तीव्र केले. स्थलांतरित कामगारांचे झालेले हाल, रोजगार गमावलेले लाखो हात आणि वाढती महागाई यामुळे श्रमिकांचे जीवन अस्थिर झाले. आजही अनेक कुटुंबे त्या संकटातून पूर्णपणे सावरलेली नाहीत. त्यामुळे 'कामगार दिन' हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता, त्यांच्या जीवनात प्रत्यक्ष बदल घडवून आणण्याची संधी म्हणून पाहिला गेला पाहिजे. आजच्या डिजिटल युगात कामाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. ऑटोमेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानामुळे अनेक पारंपरिक नोकऱ्या कमी होत आहेत, तर नव्या कौशल्यांची गरज वाढत आहे. अशा वेळी कामगारांना नव्या कौशल्यांचे प्रशिक्षण देणे, त्यांना बदलत्या बाजारपेठेसाठी सक्षम बनवणे ही शासन आणि उद्योग क्षेत्राची सामूहिक जबाबदारी आहे. महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन या दोन्हींचा खरा अर्थ समजून घेतला, तर तो 'मानवी सन्मान' या एकाच सूत्रात सापडतो. राज्याचा विकास हा केवळ इमारती, रस्ते किंवा गुंतवणुकीत मोजला जाऊ नये, तर तो सामान्य माणसाच्या जीवनमानात झालेल्या सुधारण्यात दिसला पाहिजे. कामगार, शेतकरी, विद्यार्थी, महिला प्रत्येक घटकाला समान संधी आणि न्याय मिळाल्याशिवाय प्रगतीची संकल्पना अपूर्ण राहील.

आज 'एक मे' आपल्याला केवळ भूतकाळातील गौरवाची आठवण करून देत नाही, तर वर्तमानातील आव्हानांना सामोरे जाण्याची आणि भविष्य घडवण्याची प्रेरणा देतो. महाराष्ट्राची ओळख जपायची असेल, तर विकासाच्या प्रवासात कोणताही घटक मागे राहणार नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच, कामगारांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांच्या सन्मानाचे जतन आणि सामाजिक सुरक्षा ही केवळ धोरणात्मक बाब नसून ती नैतिक जबाबदारी आहे. म्हणूनच, एक मे साजरा करताना केवळ ध्वजारोहण, मिरवणुका आणि भाषणांपुरते मर्यादित न राहता, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय, संधी आणि सन्मान पोहोचवण्याची नवी प्रतिज्ञा घेणे गरजेचे आहे. इतिहासाने दिलेल्या या वारशाला न्याय देण्यासाठी आजच्या पिढीने अधिक सजग, संवेदनशील आणि जबाबदार होणे आवश्यक आहे. हाच खरा महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनाचा व्यापक आणि अर्थपूर्ण संदेश ठरेल.

# आ.संदिप क्षीरसागरांनी घेतली पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट

## बीड शहरातील पाणी पुरवठा, रेशीम पार्क, जिल्हा न्यायालयातील वकीलांचे प्रश्न आणि मतदारसंघातील विविध विषयांवर सविस्तर चर्चा

मुंबई । प्रतिनिधी

**बीड शहरातील नागरिकांना भेडसावरणारा पाणी टंचाईचा प्रश्न, बीड जिल्ह्यात नियोजीत असलेले रेशीम पार्क, बीड जिल्हा न्यायालयातील वकीलांच्या मागण्या आणि मतदारसंघातील महत्वाचे असलेले विषय यांच्या अनुषंगाने आ.संदिप क्षीरसागर यांनी गुरूवार (दि.३०) रोजी महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.सुनेत्राताई पवार यांची मुंबई येथे भेट घेतली.**

बीड शहरात सध्या २० दिवसांआड पाणी पुरवठा होत असल्याने नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. पाण्याची उपलब्धता असून देखील बीड नगरपरिषदेकडे महावितरण विभागाची सुमारे ५६ कोटी रूपये वीज बील थकबाकी असल्याने सुरळीत पाणी पुरवठा करण्यासाठी अडथळा निर्माण झाला आहे. या संदर्भात पुर्वी स्व.अजितदादा पवार यांनी सकारात्मक भुमिका घेतली होती. त्याच धर्तीवर आ.क्षीरसागर यांनी सुनेत्राताई पवार यांनी देखील तातडीने निर्णय घेवून बीड शहराला न्याय देण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणी



केली. तसेच, बीड जिल्ह्यात नियोजीत असलेला रेशीम पार्क जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असायला हवा. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांसाठी दळण-वळणाच्या दृष्टीने बीड शहर हे मध्यवर्ती ठिकाणी असून रेशीम पार्क हे बीड कृषी उत्पन्न बाजार समिती, नवा मोंढा येथे व्हावे. जेणेकरून रेशीम उद्योगाला चालना मिळून, रेशीम उत्पादक शेतकरी बांधवांना त्याचा फायदा होईल. अशा प्रकारची आ.क्षीरसागर यांनी मागणी केली. या सोबतच बीड जिल्हा न्यायालयातील वकील बांधवांच्या विविध मागण्या असून त्यांना वकीली व्यवसाय करताना मुलभूत सोयी-सुविधांचा अभाव जाणवत आहे. जिल्हा न्यायालयाच्या इमारतीत ज्या ठिकाणी वकील बांधवांसाठी जागा उपलब्ध केलेली आहे. त्या ठिकाणी फर्निचर आणि इतर व्यवस्था नसल्यामुळे दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे पालकमंत्री म्हणून विशेष निधीतून वकील बांधवांना फर्निचर आणि तत्सम सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी विनंती आ.संदिप क्षीरसागर यांनी पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे केली. बीडच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जनतेच्या मुलभूत प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपण कायम कटीबद्ध असून जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहचविणे ही आपली जबाबदारी आहे. आणि ती आपण प्रामाणिकपणे पार पाडत राहू असे आ.संदिप क्षीरसागर यांनी सांगितले आहे.

# बीड सांगवी बीटमध्ये वाणी नावाच्या पोलिस कर्मचाऱ्याचा मनमानी कारभार

आष्टी। प्रतिनिधी

**तालुक्यातील बीड सांगवी बीटमध्ये 'वाणी' नावाचा एक पोलिस कर्मचारी स्वतःला सर्वोच्च समजून बीटमध्ये मनमानी करत असल्याची तक्रार सामान्य नागरिकांतून करण्यात येत आहे.**

या बीटमध्ये अनेक गावे असून येथे राजरोसपणे अवैध दारू, वाळू, गुटखा विक्री, डीजेचा अवाज,चौ-या,यात्रा-उत्सवांत अश्लील नृत्य (आर्केस्ट्रा) यासारखे प्रकार सुरू असल्याचे सांगितले जाते. वाणी नावाच्या कर्मचाऱ्याने 'सो करो' असा स्वतःचाच कायदा बनवून, चिरीमिरी घेऊन, परवानगीशिवाय कार्यक्रमांना खतपाणी घालून स्वतःचा फायदा करून घेतल्याचे समोर आले आहे. काही ग्रामस्थांना हाताशी धरून हे उपक्रम राबवले जात असल्याचेही स्थानिकांचे म्हणणे आहे. अशा भ्रष्ट कर्मचाऱ्यामुळे युवकवर्ग व्यसनाधीन होत असून, पालकांमध्ये गंभीर चिंता आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्याची तात्काळ बदली करावी, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे. पोलिस निरीक्षक साहेबांनी या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन मनमानी करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी सर्व सामान्य नागरिकांनी केली आहे.

# शिक्षण हा माणसाच्या जीवनाचा पाया-प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे

## डॉ.साक्षी थोरवे चा एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार

आष्टी । प्रतिनिधी

**मानवाच्या उन्नतीचे शिक्षण हे साधन आहे; किंबहुना आदर्श शिक्षकच प्रभावी शिक्षण देऊन चारित्र्यसंपन्न माणसे निर्माण करू शकतो स्वानंद थोरवे यांनी जिल्हा परिषदेतील विद्यार्थी घडवले आणि सुषमा यांनी गणेश विद्यालय मध्ये विद्यार्थी घडवले या दोघांच्या उत्तम शैक्षणिक योगदानामुळे अनेक विद्यार्थी घडले आहेत याच विद्यार्थ्यांच्या पुण्याइने त्यांची कन्या साक्षी यांनी वैद्यकीय क्षेत्रामध्ये दैदिप्यमान यश प्राप्त केले त्यामुळेच शिक्षण हा माणसाच्या जीवनाचा पाया आहे!'' असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांनी केले.**

बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे यांची नात आणि सुषमा विक्रम पोकळे-थोरवे आणि स्वानंद बलभीम थोरवे यांची कन्या डॉ. साक्षी थोरवे एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली. त्याबद्दल पत्रकार आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून डॉ.साक्षी थोरवे हिचा छोटेखानी कौटुंबिक समारंभामध्ये सत्कार करण्यात आला, यावेळी अभिनंदन करताना ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे बोलत होते. समवेत जेष्ठ माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. एमबीबीएस या आरोग्य क्षेत्रातील महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या अंतिम वर्षाच्या परीक्षेचा निकाल नुकताच अधिकृतपणे जाहीर झाला. यामध्ये डॉ. कु. साक्षी स्वानंद थोरवे ही उत्तम



गुणांनी उत्तीर्ण झाली आहे केवळ एमबीबीएस या पदवीवरच न थांबता पदव्युत्तर पदवी आणि स्पेशलायझेशन प्राप्त करावे अशा शुभेच्छा ही त्यांनी यावेळी दिल्या डॉ.साक्षी हिचे शालेय शिक्षण आष्टी येथील नामांकित जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी या ठिकाणी झाले असून तिने उच्च माध्यमिक शिक्षण राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर या ठिकाणी घेतले. अत्यंत महत्त्वपूर्ण समजला जाणारा एमबीबीएस अभ्यासक्रम तिने यशस्वीरित्या पूर्ण केला. याबद्दल तिचे विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे. 'थोरवे आणि पोकळे हे दोन्ही परिवार शिक्षण क्षेत्रातील उच्चतम विचार धारा जपणारे असून या दोन्ही कुटुंबियातील अनेकांनी उच्च शिक्षण घेतले असून आता नंतरची पिढी देखील उच्चशिक्षित होत आहे पारंपारिक आलेल्या या उच्च शैक्षणिक मूल्यांची जबाबदारी आता पुढील पिढी घेत आहे आणि ती नवी दिशा देणारआहे. या परिवारातील डॉ. साक्षी भविष्यात आरोग्य क्षेत्राची प्रमाणिक सेवा करेल! असा विश्वास व्यक्त करत त्यांनी यावेळी आशीर्वाद ही दिला. आदर्श उपक्रमशील शिक्षक स्वानंद थोरवे सर यांनी सर्वांचे आभार मानले. डॉ.साक्षी ही बीड जि.प.चे माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे यांची नात आहे. आई सुषमा विक्रम पोकळे-थोरवे ही श्री गणेश विद्यालय आष्टी येथे प्राथमिक शिक्षिका; तर वडील स्वानंद बलभीम थोरवे हे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कडा येथे प्राथमिक पदवीधर म्हणून कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या या कुटुंबातून डॉ. साक्षीच्या रूपाने आरोग्य क्षेत्रात केलेले पदार्पण प्रमाणिक सामाजिक बांधिलकीच्या सेवेचा नवा अध्याय असेल! अशा भावना यावेळी बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे यांनी व्यक्त केल्या.

# उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वात डॉ.थोरात यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश



बीड । प्रतिनिधी

**केज विधानसभा मतदारसंघात शिवसेनेच्या संघटनात्मक बळात लक्षणीय वाढ झाली असून डॉ. प्रतिभाताई अशोकराव थोरात यांनी उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत जाहीर प्रवेश करत भगवा हाती घेतला. या प्रसंगी मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनीही त्यांच्यासह शिवसेनेत प्रवेश केला. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश महत्त्वाचा मानला जात आहे.**

मुंबई येथे डॉ.थोरात यांचा पक्षप्रवेश कार्यक्रम झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ. थोरात व कार्यकर्त्यांचे स्वागत केले. यावेळी शिंदे यांनी शिवसेना ही सामान्य माणसाच्या हक्कांसाठी लढणारी संघटना असून, पक्षात येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला न्याय देण्याची आमची बांधिलकी आहे असे त्यांनी सांगितले. या पक्षप्रवेश सोहळ्यावेळी शिवसेना बीड लोकसभा संपर्कप्रमुख मनोज शिंदे, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, अनिल जगताप, स्वप्निल गलधर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याशिवाय महिला संपर्क प्रमुख संगीता चव्हाण, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे, युवासेना तालुकाप्रमुख दत्तकुमार काकडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. प्रतिभाताई अशोक थोरात यांच्या समवेत अनेक कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. यामध्ये उद्धव दळवी, प्रमोद पाटील, राजा शेख, नंदकुमार कावळे, इंद्रजीत मोरे, लाला काकडे, अशोक पांचाळ, दादासाहेब घुगे, जीवन थोरात, विलास अंबाड, लालासाहेब शिंदे, दत्ता काकडे, अनिल जोगदंड,३ बजरंग काकडे, प्रकाश थोरात आदींचा समावेश होता. या सामूहिक प्रवेशामुळे शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक बळकट झाल्याचे चित्र दिसून आले. या सामूहिक प्रवेशामुळे केज तालुक्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेने राज्यभर संघटनात्मक विस्ताराला वेग दिला आहे. विशेषतः बीड जिल्ह्यावर त्यांनी लक्ष केंद्रीत केल्याने पक्षात मोठ्या प्रमाणावर प्रवेश सुरू आहेत. कार्यकर्त्यांपासून ते स्थानिक पातळीवरील प्रभावी नेत्यांपर्यंत अनेकजण शिवसेनेकडे आकर्षित होत आहेत. येत्या काळातही जिल्ह्यातील अनेक दिग्गज नेते व कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करणार असल्याने जिल्ह्यात शिवसेनेची ताकद आणखी भक्कम होणार असल्याचे मत संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांनी व्यक्त केले.

## पान १ वरून...

### फार्मर आयडीशिवाय

याच माहितीच्या आधारे पिकांच्या गरजेनुसार खतांचे वाटप केले जाईल. ॲग्रीस्टॅक ओळख क्रमांक आणि पिक नोंदणी प्रणालीमुळे शेतकरी किती खत खरेदी करू शकतो, यावर नियंत्रण ठेवता येणार आहे. त्यामुळे अवाजवी साठेबाजी, काळाबाजार आणि अनावश्यक खरेदीवर प्रभावी आळा बसण्याची अपेक्षा कृषी विभागाने व्यक्त केली आहे. ज्या शेतकऱ्यांकडे अद्याप ॲग्रीस्टॅक ओळख क्रमांक नाही, त्यांनी तात्काळ नोंदणी करून घ्यावी, अन्यथा भविष्यात खत खरेदीत अडचणी निर्माण होऊ शकतात. ही नवीन व्यवस्था शेतकऱ्यांसाठी सुरुवातीला थोडी क्लिष्ट वाटू शकते, मात्र दीर्घकालीन दृष्टीने पारदर्शकता आणि समान वितरण सुनिश्चित करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

-------------

### टीएमसी कार्यकर्त्यांचे मनोधैर्य

त्या म्हणाल्या की, त्यांचा पक्ष २२६ हून अधिक जागांसह मोठ्या विजयाकडे वाटचाल करत आहे. एका व्हिडिओ संदेशाद्वारे कार्यकर्त्यांना संबोधित करताना बॅनर्जी यांनी संपूर्ण मतमोजणी काळात सतत सतर्क राहण्याचे आवाहन केले. सर्व २९४ मतदारसंघांतील मतमोजणी केंद्रांवर उमेदवार आणि ज्येष्ठ नेत्यांनी वैयक्तिकरित्या लक्ष ठेवावे, असे त्यांनी सांगितले. मी आपल्या कार्यकर्त्यांना आणि जनतेला विनंती करते की त्यांनी एकजुटीने आजपासूनच मतमोजणी प्रक्रियेवर बारीक लक्ष ठेवावे. गरज पडल्यास, मी स्वतः माझ्या (भवानीपूर) मतदारसंघात पहारा देण्यासाठी बाहेर पडेल, असे त्या म्हणाल्या. मुख्यमंत्र्यांनी २०२१ च्या निवडणुकीचा दाखला दिला. त्यावेळीही एक्झिट पोलने भाजपला विजय मिळवून दिला होता, परंतु प्रत्यक्षात निकाल पूर्णपणे वेगळे लागले होते. २०१६ मध्येही हेच घडले आणि २०२१ मध्येही याचीच पुनरावृत्ती झाली. वेळोवेळी दाखवण्यात आलेले एक्झिट पोल पूर्णपणे भाजपच्या बाजूने झुकलेले होते, असे त्यांनी स्पष्ट केले. बॅनर्जी यांनी असा दावा केला की, मतमोजणीच्या दिवसापूर्वी लोकांची मानसिकता बदलण्यासाठी मीडियाच्या माध्यमातून हा प्रचार केला जात आहे. हा मीडिया प्रचार भाजपने जाणीवपूर्वक आयोजित केला आहे कारण त्यांना स्पष्टपणे दिसत आहे की ते आपल्याला रोखू शकत नाहीत. तृणमूल प्रमुखानी कार्यकर्त्यांना ईव्हीएम मशिनवर बारकाईने लक्ष ठेवण्याचा इशारा दिला, विशेषतः स्ट्राँग रूममधून मतमोजणी हॉलमध्ये मशिन नेले जात असताना. ''ईव्हीएम मशिन हलवण्याच्या या काळात मशिन बदलण्याचा भाजपचा कट असू शकतो,'' असा खळबळजनक आरोप त्यांनी केला.

-------------

### बच्चू कडूंचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश,

घेतलेला मोठा पुढाकार निश्चितच शेतकऱ्यांना दिलासा देणारा आहे. असे कडू यांनी म्हटले आहे. ही लढाई केवळ पदापुरती मर्यादित राहणार नाही. तर आम्ही जे मुद्दे दिले आहेत; त्यात दिव्यांग मंत्रालयाचे बळकटीकरण, शेतकरी, शेतमजुरांची सर्व कामे, हमीभावाची लढाई या सर्व मुद्यांवर चर्चा करुन मी निर्णय घेतला. प्रहार एक सामाजिक संघटना म्हणून पावले टाकेल. तर राजकारण शिवसेनेचे राहील. पक्ष मजबूत केल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, असे बच्चू कडू यांनी आश्वासन दिले आहे. एकनाथ शिंदे म्हणाले की, प्रहार ही सामाजिक संघटना आहे. ती राजकीय संघटना नाही. ही संघटना आता शिवसेनेशी संलग्न राहील. आता प्रहार संघटनेला बळ मिळेल. मी मुख्यमंत्री असताना बच्चू कडू यांच्या मागणीनुसार, दिव्यांग मंत्रालय सुरु केले. त्याचा फायदा दिव्यांगांना होत आहे. त्याचबरोबर कष्टकरी शेतकरी आणि गोरगरीब जनतेचे जे प्रश्न आहेत ते आपण हाती घ्यावेत. एकनाथ शिंदे आपल्या गंभीरपणे पाठीशी आहे. हा शब्द आहे, अशी ग्वाही शिंदे यांनी कडू यांना दिली.

-------------

### राज्यात आज नवीन बारा

राबवली जात आहे. या सुविधेमुळे राज्यातील हजारो किडनी विकारग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे. ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा तसेच जिल्हा रुग्णालयांपर्यंत ही सेवा पोहोचवून ग्रामीण भागातील रुग्णांना घराजवळच निःशुल्क उपचार मिळावेत, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण रुग्णालयांत किमान ५ बेड्स, तर उपजिल्हा व जिल्हा रुग्णालयांत ८ ते १० डायलिसीस बेड्सची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सध्या राज्यात ९२ महाडायलिसीस केंद्रे कार्यरत असून त्यामध्ये ५५८ डायलिसिस बेड्स उपलब्ध आहेत. महाराष्ट्र दिनी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते १२ नवीन केंद्रांचे लोकार्पण होणार असून, त्यामुळे एकूण केंद्रांची संख्या १०४ वर पोहोचणार आहे. या नव्या केंद्रांमध्ये दुर्गम भागातील रुग्णालयांचाही समावेश करण्यात आला आहे. 'महाडायलिसीस' योजना एंड-टू-एंड डिजिटल प्लॅटफॉर्मवर आधारित असून, संकेतस्थळावर तसेच मोबाइल ॲपद्वारे माहिती व सेवा उपलब्ध आहेत. रुग्णांना ऑनलाईन स्लॉट बुकिंगची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे उपचारासाठी प्रतीक्षा कालावधी कमी झाला आहे. या केंद्रांमध्ये प्रशिक्षित डायलिसीस तंत्रज्ञ, नर्सेस व सहाय्यक कर्मचारी कार्यरत असून, नेफ्रोलॉजिस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार दिले जात आहेत. स्वच्छता, सुरक्षितता आणि वैद्यकीय मानकांचे काटेकोर पालन केले जात आहे. तसेच रक्त तपासणी, आवश्यक इंजेक्शन आणि आहारतज्ज्ञांचा सल्ला यांसारख्या सेवा रुग्णांना पूर्णतः मोफत दिल्या जातात. ही योजना केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाअंतर्गत एचएलएल लाइफकेअर लिमिटेड या संस्थेमार्फत राबवली जात असून, सर्व केंद्रांमध्ये गुणवत्तापूर्ण सेवा देण्यावर भर दिला जात आहे. 'महाडायलिसीस' योजनेमुळे खासगी उपचारांवरील आर्थिक भार कमी होऊन सरकारी रुग्णालयांतच दर्जेदार व मोफत सेवा उपलब्ध झाल्याने राज्याच्या आरोग्य व्यवस्थेला मोठी बळकटी मिळत आहे,

**या रूग्णालयात मिळणार सुविधा**

लोकार्पण होणाऱ्या केंद्रांमध्ये मुरगुड (जि. कोल्हापूर), मूल (जि. चंद्रपूर), दारव्हा (जि. यवतमाळ), केज (जि. बीड), इगतपुरी (जि. नाशिक), रावेर (जि. जळगाव), मंगळवेढा (जि. सोलापूर), ढेबेवाडी (जि. सातारा), वेंगुर्ला (जि. सिंधुदुर्ग), कुरखेडा (जि. गडचिरोली), दापोली (जि. रत्नागिरी) आणि बदलापूर (जि. ठाणे) येथील रुग्णालयांचा समावेश आहे.

**सात जिल्ह्यांतील शासकीय रुग्णालयांमध्ये एमआरआय सेवा**

यासोबतच भंडारा, बुलढाणा, अमरावती, नांदेड, धाराशिव, हिंगोली आणि परभणी या सात जिल्ह्यांतील शासकीय रुग्णालयांमध्ये एमआरआय सेवा सुरू करण्यात येत आहे. या सेवा चोवीस तास उपलब्ध राहणार असून सर्व शासकीय रुग्णांसाठी पूर्णपणे मोफत असतील. या प्रकल्पासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ, जसे की टेक्निशियन व रेडिओलॉजिस्ट, हे सेवापुरवठादारा मार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. एमआरआय ही आधुनिक वैद्यकीय तपासणी पद्धत असून, शरीरातील अंतर्गत अवयवांचे सविस्तर व उच्च गुणवत्तेचे चित्र मिळवण्यासाठी ती उपयुक्त ठरते.

-------------

### महाराष्ट्रात एस्सी आरक्षणाचे

जवळपास १५ हजारांच्या आसपास हरकती-सूचना मातंग समाजातून आल्याचे कळते, तर महार समाजाकडून त्या खालोखाल ई-मेल पाठविण्यात आले आहेत. न्या. बदर समितीचा अहवाल जाहीरच न केल्याने याविषयी कमालीची नाराजी एससी प्रवर्गात आहे. मात्र, विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या अहवालाचा सर्वाधिक फटका महार समाजाला आणि काही प्रमाणात मेहतर समाजाला बसणार असल्याचे कळते. एससी प्रवर्गातील ५९ जातींच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्यात येणार आहे. यासाठी २०११ची जनगणना आणि अभियांत्रिकी (इंजिनिअरिंग) कॉलेजात शिकणारे या जातींमधील विद्यार्थी यांची माहिती घेण्यात आल्याचे समजते.

**मांग-मातंग समाज मागे**

मिळालेल्या माहितीनुसार, सर्वाधिक प्रवेश हे दलित (महार) त्यापाठोपाठ चर्मकार आणि सर्वांत शेवटी मांग-मातंग या समाजातील विद्यार्थ्यांनी घेतल्याचे आढळून आले. हा धागा पकडूनच उपवर्गीकरणात आरक्षणाचा अधिकचा टक्का मांग-मातंग समाजाला मिळावा, अशी शिफारसही बदर अहवालात करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

-------------

### आजपासून एलपीजी सिलेंडरच्या

१ मे पासून लागू होतील. इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (इन्डेन), भारत पेट्रोलियम (भारत गॅस) आणि हिंदुस्तान पेट्रोलियम (एचपी गॅस) यांसारख्या तेल कंपन्या १ मे पासून नवीन नियम लागू करण्याची तयारी करत आहेत. या बदलांचा उद्देश एलपीजी गॅसची साठेबाजी, काळाबाजार आणि गैरवापर रोखणे हा आहे. शहरांमध्ये, नवीन सिलेंडर बुक करण्यापूर्वी तुम्हाला किमान २५ दिवस थांबावे लागेल, तर ग्रामीण भागात हा कालावधी ४५ दिवसांपर्यंत असू शकतो. जर कोणी मुदतीपूर्वी बुकिंग करण्याचा प्रयत्न केला, तर सिस्टम त्यांना आपोआप ब्लॉक करेल. याव्यतिरिक्त, ओटीपीशी संबंधित बदलही होणार आहेत. १ मे पासून, एलपीजी सिलेंडर वितरणासाठी ओटीपी-आधारित प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे. ग्राहक आता केवळ आपले पुस्तक किंवा पावती दाखवून सिलेंडर घेऊ शकणार नाहीत; त्यांना बुकिंगनंतर त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल नंबरवर पाठवलेला ओटीपी (डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड) देणे देखील आवश्यक असेल. प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी आधार-आधारित ईकेवायसी अनिवार्य केले आहे.

थोडक्यात



बीड : शिवसेना महिला आघाडी माजी जिल्हाप्रमुख सौ. अलकाताई डावकर, युवासेना माजी शहराध्यक्ष प्रा. स्वप्नील डावकर यांनी भाजपा जिल्हा कार्यालय बीड येथे जिल्हाध्यक्ष मा. शंकरजी देशमुख यांची सदिच्छा भेट घेऊन स्वागत केले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ आण्णा शिराळे, नगरसेवक ॲड. गोविंद शिराळे उपस्थित होते.

## मुस्लिम संरक्षण आंदोलनास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा – नुमान चाऊस

माजलगाव । प्रतिनिधी



मुस्लिम समाजाच्या विविध न्याय्य मागण्या व हक्कांसाठी एकदिवसीय लक्षनिक आंदोलनाचे आयोजन करण्यात आले असून, या आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मौलाना आझाद युवा मंचचे जिल्हाध्यक्ष नुमान अली चाऊस यांनी केले आहे. हे आंदोलन १ मे रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे सकल मुस्लिम समाज व संरक्षण कृती समिती यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनाचे नेतृत्व प्रा. इलियास इनामदार करत आहेत.प्रा. इलियास इनामदार यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजाच्या उन्नतीसाठी वाहिले असून, मुस्लिम आरक्षण, संरक्षण व विविध सामाजिक प्रश्नांवर त्यांनी सातत्याने काम केले आहे. या आंदोलनाचा उद्देश समाजाच्या प्रलंबित मागण्या व समस्या प्रशासनापर्यंत शांततामय मार्गाने पोहोचवणे हा आहे. समाजाच्या हक्कांसाठी सर्वांनी एकजूट दाखवून मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नुमान अली चाऊस यांनी केले आहे.

## बुद्ध जयंतीनिमित्त भव्य धम्म रॅली व भन्ते धम्मबोधी आणि भन्ते मोग्गलायन यांची धम्मदेशना

परळी । प्रतिनिधी

अखिल विश्वाला शांती आणि समतेचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांची १ मे रोजी होत असलेल्या २५७० व्या जयंतीनिमित्त परळी शहरात भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने भव्य धम्म रॅली व त्यानंतर अजनी , नागपूर येथील भन्ते धम्मबोधी व भन्ते महामोग्गलायन यांची धम्मदेशना होणार आहे.या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. दिनांक १ मे शुक्रवार रोजी तथागत गौतम बुद्ध यांची २५७० वी जयंती आहे.या निमित्ताने भारतीय बौद्ध महासभा,शाखा परळी तालुका व शहर यांच्या वतीने भव्य धम्म रॅली काढण्यात येणार आहे.राणी लक्ष्मीबाई टॉवर येथून सायंकाळी ६ वाजता धम्म रॅलीस सुरवात होईल.पुढे मोंढा मार्केट, स्टेशन रोड, एक मिनार चौक मार्गे रॅली रेल्वे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ पोहोचणार आहे. तेथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केल्यानंतर भारतीय बौद्ध महासभेचे परळी तालुका अध्यक्ष हनुमंत वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कार्यक्रमात भन्ते धम्मबोधी, वैशाली बुद्ध भुमी नागपूर आणि पोखर्णी येथील भंन्ते मोग्गलायन यांची धम्मदेशना होणार आहे. या धम्म रॅली त बौद्ध उपासक, उपासिका व बुद्ध अनुयायांनी शुभ्र वस्त्र परिधान करून सहभागी होण्याचे आवाहन भारतीय बौद्ध महासभा , समता सैनिक दलाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कर्जबाजारी शेतकऱ्याची चिंचवडगावात आत्महत्या

## सततची नापिकी आणि शेतमालाला भाव नसल्यामुळे झाला कर्जाचा डोंगर

वडवणी । प्रतिनिधी

शेतात सततची नापिकी आणि उत्पादित झालेल्या मालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे कर्जाचा डोंगर झालेला कसा फेडायाचा त्यातच शासनाकडून पिक विमा आणि कर्जमाफीला होणारा विलंब यामुळे वडवणी तालुक्यातील चिंचवडगाव येथील एका वयोवृद्ध शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना काल बुधवारी सकाळी घडली. उत्तम भानुदास तिडके वय ६२ असे शेतकऱ्याचे नाव असून सदर शेतकऱ्याला शासनाने तात्काळ आर्थिक मदत करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.



वडवणी तालुक्यात शेतकऱ्यांचे जीवन अत्यंत हलकीचे झाले आहे. कधी कोरडा तर कधी ओल्या दुष्काळाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. सन २०२५ च्या खरीप हंगामात वडवणी तालुक्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली होती. त्यामध्ये पिकाचे मोठे नुकसान झाले होते. शेतकऱ्यांच्या हातातील सर्व पीक वाया गेले होते. शासनाने तुटपुंजी आर्थिक मदत केली मात्र एप्रिल महिना संपत आला तरी अद्यापही पिक विमा शेतकऱ्यांना दिला नाही. कर्जमाफीचे भिजत घोंगडे अजूनही चालू आहे. शेतमालाला योग्य भाव नाही त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडलेले आहेत. वडवणी तालुक्यातील चिंचवडगाव येथील उत्तम भानुदास तिडके हे ६२ वर्षीय वृद्ध शेतकरी दोन एकर जमिनीवर उदरनिर्वाह करत होते. दोन मुलं विवाहित असून कारखान्यावर ऊस तोडणी करून उदरनिर्वाह करतात. तर तीन मुलींचे लग्न झालेले आहेत. घरातील आर्थिक अडचणी भागवण्यासाठी त्यांनी बँकांकडून व खाजगी कर्ज उचलले होते मात्र शेतीतून काही उत्पन्नच मिळत नसल्यामुळे त्यांच्याकडून कर्जाची परतफेड झाली नाही. लोकांची आणि बँकांची देणे कसे फेडायची या अडचणीतून ते नेहमीच तणावात असत त्यातच दवाखाना आणि घर खर्च भागविण्याच्या अडचणी नेहमी होत्या. या तणावातूनच त्यांनी बुधवारी सकाळी आठ वाजता विषारी औषध प्राशन केले. कुटुंबियांच्या लक्षात आल्यानंतर त्यांना तत्काळ बीडच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र तेथे जाण्या अगोदरच त्यांची प्राणज्योत मालवली या घटनेमुळे वडवणी तालुक्यात शोककाळा पसरली आहे. सदर शेतकऱ्याचे कुटुंब उघड्यावर पडले असून या कुटुंबाला तात्काळ आर्थिक मदत करावी अशी मागणी सर्व पक्ष संघटनांच्या कार्यकर्त्यांनी केली आहे.

खिशात निघाले पाच रुपये

मयत उत्तम तिडके यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कपड्यांची पाहणी केली असता त्यांच्या खिशात केवळ पाच रुपये सापडले. यावरून ते किती अडचणीत होते याचा अंदाज काढता येईल.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त युगप्रवर्तक महोत्सवात व्याख्यान व कवी संमेलन उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांच्या वतीने युगप्रवर्तक महोत्सव-२६ चे आयोजन दिनांक २६ व २७ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी या दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या रंगमंचावर युगप्रवर्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.महोत्सवाच्या पहिल्या दिवशी व्याख्यान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.प्रसिद्ध व्याख्याते श्रीकांत बरिंगे यांनीआधुनिक भारताचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्व स्तरावरील कार्याबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निलाताई देशमुख होत्या.त्यांनीही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे





महिला,शेतकरी,कामगार व आधुनिक आधुनिक भारताच्या जडणघडणीत असलेले अनन्यसाधारण महत्त्व विशद केले.

दि.२७ एप्रिल रोजी विद्रोही कवींचे भव्य कवी संमेलन घेण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस उपनिरीक्षक आकाश माकने होते.यावेळी आंबेडकरी चळवळीचे प्रसिद्ध गायक लोककवी वामनदादा कर्डक यांचे नातू संदेश शालिनी संभाजी कर्डक यांच्यासह बबन सरवदे,सुमित गुणवंत,सुदेश जगताप,गजानन गावंडे यांच्या विद्रोही कविता सादर करून उपस्थितांना प्रेरित केले. संदेश कर्डक यांच्या विद्रोही कवितांनी उपस्थित श्रोत्यांमध्ये एक नव चेतना निर्माण झाली. त्यांनी सादर केलेली कविता कोण आंबेडकर...?

माझी भूक,माझी तहान आंबेडकर या कवितेने लोकांना भारावून टाकले. सुमित गुणवंत यांच्या पहाडी आवाजात,शनिवार वाड्याची पायरी चढण्या अगोदर,फुले वाड्यांची पायरी चढली असती तर? या कवितेने सुद्धा प्रेक्षकांतुन जोरदार टाळ्या मिळविल्या. बबन सरवदे,सुरेश जगताप,गजानन गावंडे यांनीही इथोचित कविता व गझला सादर केल्या.या कार्यक्रमांमध्ये शहरात डॉल्बीमुक्त जयंती साजरी करणाऱ्या फुलेनगर व सम्राट अशोक नगर येथील जयंती उत्सव कमिटी पदाधिकाऱ्यांचा आयोजकाच्या वतीने,लोककवी वामनदादा कर्डक यांचे नातू विद्रोही कवी संदेश शालिनी संभाजी कर्डक व उपस्थित कवींच्या हस्ते शिवाजी कोण होता ? हे पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. या दोन दिवसीय महोत्सवात शासकीय व निमशासकीय कर्मचारी,पत्रकार,विध्यार्थी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.या सामाजिक प्रबोधनात्मक कार्यक्रमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची जागृती आणि सामाजिक समतेचा संदेश व्यापकपणे पोहोचवला.या दोन्ही कार्यक्रमाचे अनुक्रमे प्रास्ताविक बाळासाहेब सोनसळे सर व राहुल टाकणखार यांनी केले.तर सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव व प्रवीण काळे यांनी केले.आभार प्रा.संजय बागुल व भारत टाकणखार यांनी मानले.आगामी काळातही अशाच प्रकारच्या सामाजिक समता निर्माण करणाऱ्या वैचारिक कार्यक्रमाचे आयोजन सातत्याने होणार असल्याचे शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांनी सांगितले. व हा युगप्रवर्तक महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य केल.

पान ६ वरुन...

### गेवराईत अवैध वाळू उपसा

कारवाईत केनीच्या साहाय्याने बेकायदेशीरपणे वाळू उपसा करणारे विना क्रमांकाचे दोन ट्रॅक्टर आढळून आले. पोलिसांनी ट्रॅक्टर आणि केनीसह एकूण १३,००,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जागीच जप्त केला. जप्त केलेले ट्रॅक्टर पोलीस ठाण्यात आणण्यात आले असून, संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, पोलीस उपनिरीक्षक नितीन शिंदे, कल्याण राठोड, गोरक्ष डोके, धिरज खांडेकर आणि ऋषी पोटे यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

### ईगलवूड इंग्लिश स्कूलचा

जोडले गेले आहे. भावेशच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेच्या अध्यक्षा डॉ. अर्चना पवार, सचिव डॉ. शरद पवार, विश्वस्त डॉ. सुशील भैय्या लोढा तसेच प्राचार्य सत्यजित सर यांनी त्याचे मनःपूर्वक कौतुक केले. त्यांच्या मते, विद्यार्थ्यांची चिकाटी, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच अशी उज्ज्वल यशोगाथा घडते. या यशामुळे शाळेच्या सर्व शिक्षकांमध्ये आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून पालकांमध्येही शाळेबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्तबद्ध वातावरण आणि सर्वांगीण विकास यांमुळे ईगलवूड इंग्लिश स्कूल हीच पालकांची पहिली पसंती बनत आहे. ईगलवूड इंग्लिश स्कूलची ही यशस्वी घोडदौड भविष्यातही अशीच सुरू राहो, अशीच सर्वांकडून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### परळी नगर परिषदेच्या

बागवाले यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच शहरातील अग्निशमन यंत्रणा अधिक सक्षम व तत्पर करण्यासाठी ठोस उपाययोजना न झाल्यास परळीकरांच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे. दरम्यान, या घटनेमुळे शहरातील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, नगर परिषदेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### उष्मघातापासून बचाव

वर्तमान पत्रातील माहितीचा वापर करण्यात यावा,

हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत.

बाहेर जातांना गॉगल्स, छत्री, टोपी, बूट व चपलांचा वापर करण्यात यावा. प्रवास करतांना पिण्याच्या पाण्याची बाटली सोबत घ्यावी. उन्हात काम करत असलेल्या कामगारांनी / व्यक्तींनी डोक्यावर टोपी किवा पांढरा रुमाल बांधावा किवा छत्रीचा वापर करावा. तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा,शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्या ओ.आर.एस. घ्यावे, घरी तयार करण्यात आलेली लस्सी / ताक / कैरीचे पन्हे / लिंबू पाणी इत्यादीचा नियमित वापर करावा.

**अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे**

ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. गुरांना / पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवण्यात यावे तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे.घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात.पंखे, ओले कपडे यांचा वापर करण्यात यावा तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे.कामाच्या ठिकाणी कामगारांसाठी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी.सूर्य प्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचित करण्यात यावे.पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. बाहेर उन्हात काम करीत असतांना थोड्या थोड्या अंतराने विश्रांती घ्यावी,गरोदर स्त्रिया आणि आजारी कामगारांची अधिक काळजी घेण्यात यावी.रस्त्याच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरिता शेड उभारावेत. जागोजागी पाणपोईची सुविधा करण्यात यावी.कॉंक्रीट घराचे छतावर पांढरा रंग द्यावा.टीन पत्र्याचे छतावर गवताची पेंढी / धान्याचा कडवा यांचे आच्छादन करावे,छतावरील पाणी साठवण्याच्या प्लास्टिक टाक्या गोणपाटाच्या सहाय्याने झाकाव्यात.अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारणचे अध्यक्ष बीड यांनी दिल्या आहे.

### महा डायलिसीस योजनेअंतर्गत

लोकार्पण होणाऱ्या केंद्रांमध्ये मुरगुड (जि. कोल्हापूर), मूल (जि. चंद्रपूर), दारव्हा (जि. यवतमाळ), केज (जि. बीड), इगतपुरी (जि. नाशिक), रावेर (जि. जळगाव), मंगळवेढा (जि. सोलापूर), ढेबेवाडी (जि. सातारा), वेंगुर्ला (जि. सिंधुदुर्ग), कुरखेडा (जि. गडचिरोली), दापोली (जि. रत्नागिरी) आणि बदलापूर (जि. ठाणे) येथील रुग्णालयांचा समावेश आहे. 'महाडायलिसीस' योजना एंड-टू-एंड डिजिटल प्लॅटफॉर्मवर आधारित AgyZ, http://mahadialysis.in या संकेतस्थळावर तसेच मोबाइल ॲपद्वारे माहिती व सेवा उपलब्ध आहेत. रुग्णांना ऑनलाईन स्लॉट बुकिंगची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे उपचारासाठी प्रतीक्षा कालावधी कमी झाला आहे. या केंद्रांमध्ये प्रशिक्षित डायलिसीस तंत्रज्ञ, नर्सेस व सहाय्यक कर्मचारी कार्यरत असून, नेफ्रोलॉजिस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार दिले जात आहेत. स्वच्छता, सुरक्षितता आणि वैद्यकीय मानकांचे काटेकोर पालन केले जात आहे. तसेच रक्त तपासणी, आवश्यक इंजेक्शन आणि आहारतज्ज्ञांचा सल्ला यांसारख्या सेवा रुग्णांना पूर्णतः मोफत दिल्या जातात.ही योजना केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाअंतर्गत एचएलएल लाइफकेअर लिमिटेड या संस्थेमार्फत राबवली जात असून, सर्व केंद्रांमध्ये गुणवत्तापूर्ण सेवा देण्यावर भर दिला जात आहे. 'महाडायलिसीस' योजनेमुळे खासगी उपचारांवरील आर्थिक भार कमी होऊन सरकारी रुग्णालयांतच दर्जेदार व मोफत सेवा उपलब्ध झाल्याने राज्याच्या आरोग्य व्यवस्थेला मोठी बळकटी मिळत आहे.

## नाव्होली येथे विविध मान्यवरांचे सत्कार

### आदर्श गाव निर्मितीसाठी योगदान देण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील नाव्होली गावात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम सरपंच रणजीत बप्पा बिक्कड यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता. यावेळी इंदुबाई रणजीत बिक्कड यांच्यासह गावातील अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान आदर्श गाव निर्मितीसाठी प्रत्येकाने योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले.



या कार्यक्रमात भारतरत्न पुरस्कार प्राप्त शाळा तसेच त्या शाळेतील शिक्षक व शिक्षिकांचा सत्कार करण्यात आला. याचबरोबर पोलीस पाटील पदासाठी नियुक्ती झालेल्या छाया बिक्कड यांचा विशेष सत्कार करण्यात आला. छाया अंकुश बिक्कड /घुले यांनी यापूर्वी ११ महिने संबंधित शाळेत कॉन्ट्रॅक्ट बेसवर उत्कृष्ट सेवा दिली होती. त्यांच्या मेहनत, जिद्द आणि चिकाटीमुळे त्यांना या पदाची संधी मिळाल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले.तसेच सेवानिवृत्त अंगणवाडी सेविकांचा देखील सत्कार करण्यात आला.यावेळी मानसतज्ञ व समुपदेशक मनीषा नामदेव बिक्कड/घुले यांचा देखील विशेष सत्कार करण्यात आला. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत अंधश्रद्धा निर्मूलनाचे महत्त्व पटवून दिले. अंधविश्वासांना बळी न पडता वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारावा, तसेच प्रत्येक महिलेने आपल्या भावना निर्भयपणे व्यक्त कराव्यात, असे त्यांनी सांगितले. यासोबतच किशोरवयीन मुलांसाठी समुपदेशन सुविधा उपलब्ध असल्याने शाळांमध्ये विविध समुपदेशन कार्यक्रम राबवावेत, अशी विनंती त्यांनी केली. तसेच मानसिक आरोग्य जपण्यासाठी समाजातील प्रत्येकाने पुढे येणे गरजेचे असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

## माजलगाव बसस्थानकात नितीन जुजगर यांच्या वतीने पाणपोई सुरू

माजलगाव । प्रतिनिधी

वाढत्या उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन माजलगाव येथील सामाजिक कार्यकर्ते नितीन सोपानअप्पा जुजगर माजलगावकर यांच्या वतीने बसस्थानक परिसरात प्रवाशांसाठी पाणपोईची व्यवस्था करण्यात आली आहे. या स्तुत्य उपक्रमाचे उद्घाटन जोशी साहेब व अमोल डाके यांच्या हस्ते नुकतेच पार पडले.

उन्हाळ्याच्या कडाक्यात प्रवासी, वाटसरूंची तहान भागवण्यासाठी ही पाणपोई सुरू करण्यात आली असून, ती सर्वसामान्यांसाठी मोठा दिलासा ठरत आहे. सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे गोरगरीब प्रवाशांना आता बाटलीबंद पाणी विकत घेण्याची गरज भासणार नाही. विशेषतः लांब पल्ल्याच्या प्रवासात पाण्याची सोय करणे कठीण असलेल्या नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

याप्रसंगी बोलताना नितीन जुजगर म्हणाले की, उन्हाळ्यात पाण्यासाठी सर्वसामान्यांचे होणारे हाल पाहून आपण ही सेवा प्रवाशांना शुद्ध आणि थंड पाणी मिळावे हाच यामागचा उद्देश असून, उन्हाळ्याच्या अखेरपर्यंत ही सेवा सुरू राहील, असे त्यांनी सांगितले.

या पाणपोईमुळे प्रवासी, बसचालक, वाहक तसेच स्थानिक नागरिकांची मोठी सोय झाली असून, प्रवाशांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.




जोशी साहेब व अमोल दादा डाके यांच्या हस्ते या पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सुनील गोसावी, आकाश गिरी, अमोल शहाणे, बाळू शिंदे तसेच एसटी महामंडळ माजलगाव येथील कर्मचारी उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी बसस्थानकातील चालक, वाहक, प्रवासी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच उपस्थितांना पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,रामबागचे नवीन जागेत स्थलांतर

वडवणी । प्रतिनिधी

विद्यार्थी,पालक, शिक्षण प्रेमी यांच्यासाठी,अत्यंत आनंदाची बाब आहे की,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,रामबाग वडवणी ही आता नूतन सुसज्ज इमारतीमध्ये स्थलांतरित होत आहे. या प्रवासात शाळेच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी अनेक माजी विद्यार्थी,प्रतिष्ठित नागरिक, शिक्षणप्रेमी आणि युवा उद्योजकांनी आपले मोलाचे योगदान दिले आहे.

शाळा स्मार्ट झाली तर नक्कीच उज्वल भवितव्य असणारी पिढी तयार होईल म्हणून आपण दिलेल्या या मदतीबद्दल शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ आपले ऋणी आहोत.

आमचे प्रेरणास्थान देणगीदार पुढील दानशूर व्यक्तीनी देणगी दिली आहे त्यांची नावे श्री.नागेशभाऊ डिगे नगरसेवक तसेच १) श्री.विनोदशेट असलकर इन्व्हर्टर व बॅटरी २)श्री.भाई उजगरे सामाजिक नेते ११ सीलिंग फॅन ३) श्री.अजय भैरट (युवा उद्योजक) ४ सीसीटीव्ही कॅमेरे ४) श्री.दत्तात्रय टिपरे (सहशिक्षक व माजी विद्यार्थी) १५ खुर्च्या ५) सौ.सीमाताई रामदास आठवले (अध्यक्ष, रिपाई महाराष्ट्र) २००० लिटर पाणी टाकी (०१) ६) श्री.महादेव दादा उजगरे (तालुकाध्यक्ष, रिपाई वडवणी) २००० लिटर पाणी टाकी (०१) ७) श्री.प्रकाश कुरकुटे सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) ८) श्री. सुदाम खटावकर सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) ९) श्री. भिवराज कोकणे सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) १०)श्री. वैभव बिडकर सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) ११) श्री.प्रफुल टकले सर (माजी विद्यार्थी) व्हाईट बोर्ड (०१) १२) बालाघाट




**माजी विद्यार्थी,शिक्षणप्रेमी आणि युवा उद्योजक यांनी भौतिक सुविधांसाठी शाळेला केली मदत**

फिटनेस ग्रुप संपूर्ण लाईट फिटिंगचा खर्च १३) महादेव खुपसे पेंटर व नंदकुमार खुपसे =सर्व शाळेला रंगरंगोटी १४) सुरज टोम्पे सर चौडेश्वरी क्लासेस=सर्व महापुरुष फोटो संच १५) वचिष्ठ अण्णा वरवडे माजी सरपंच जागा उपलब्ध १६) विलास अण्णा ढोले सर्व पाणी बांधकाम साठी पुरवठा १७) कल्याण वारे पिण्याचे पाण्याची सोय विद्यार्थ्यांना कायम १८) गणेश टकले शालेय अध्यक्ष कागद पूर्तता १९) ज्ञानेश्वर रोकडे महाराष्ट्र कोष्टी समाज अध्यक्ष वडवणी १५x१५ च्या ५ चटाई २०) रामेश्वर पारखे शाळेसाठी संगणक व प्रिंन्ट मशीन १, २१) परमेश्वर कुरकुटे २ शिक्षक टेबल, २२) सौ.मिना नवनाथ रोकडे १० खुर्च्या ,२३) गणेश माळवदे १ व्हाईट बोर्ड, २४) लहू खारगे २ साऊंड व २ माईक, २५) ऋषिकेश तेटांबे १ टेबल, २६) कृष्णा महादर २ साऊंड कर्ना २७) शोभाताई खाटवकर तर्फे भाषण डाईस १, २८) तिरुपती ग्रुप ४० लेक्षीम तसेच बालाघाट मॉर्निंग ग्रुप च्या वतीने सर्व शाळा परिसर स्वच्छ, साफसफाई करून दिली.आपल्या सर्वांच्या सहकार्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,रामबाग वडवणी ही आता नूतन सुसज्ज इमारतीमध्ये स्थलांतरित होत आहे. या प्रवासात शाळेच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी अनेक माजी विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक, शिक्षणप्रेमी आणि युवा उद्योजकांनी आपले मोलाचे योगदान दिले आहे.

आपण दिलेल्या या मदतीबद्दल शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ आपले ऋणी आहोत.

देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे , घेता घेता एक दिवस देणाऱ्यांचे हातच घ्यावेत..!

वरील कवितेच्या ओळीतून देणाऱ्याची दान करण्याची वृत्ती आपण स्वीकारावी हा संदेश आपल्याला रामबाग शाळेला मदत केलेल्या दानशूर देणगीदाराकडून मिळतो.

# केंद्र सरकारने इथेनॉलबाबत घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार

दिल्ली : भारताला इंधन क्षेत्रात स्वावलंबी बनविण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने आता एक पाऊल पुढे टाकले आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने वाहनांच्या उत्सर्जन नियमांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करण्याचा प्रस्ताव मांडला असून, यामुळे देशात ८५% (ई८५) आणि १००% (ई१००) इथेनॉलमिश्रित इंधनावर चालणाऱ्या गाड्या धावण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

केंद्रीय मोटर वाहन नियम १९८९ मध्ये बदल सुचवणारी अधिसूचना मंत्रालयाने २७ एप्रिल रोजी प्रसिद्ध केली आहे. सध्या पेट्रोलमध्ये १० ते २० टक्के इथेनॉल मिश्रण केले जाते. मात्र, नवीन प्रस्तावानुसार आता ई८५, ई१०० यांसारख्या उच्च इथेनॉल मिश्रणासह, शुद्ध बायोडिझेल (बी१००) आणि हायड्रोजन-सीएनजी इंधनालाही अधिकृत




मान्यता दिली जाणार आहे. इथेनॉलची निर्मिती ऊस, मका आणि तांदूळ यांसारख्या पिकांपासून केली जाते. या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनाला मोठा भाव मिळेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल. दुसरीकडे, कच्च्या तेलाच्या आयातीवर खर्च होणारे अब्जावधी डॉलर्स वाचण्यास मदत होणार आहे. मंत्रालयाने या प्रस्तावांवर ३० दिवस सार्वजनिक सूचना कालावधी ठेवला आहे. नागरिक आणि वाहन उद्योगातील तज्ज्ञ आपल्या सूचना किंवा हरकती नोंदवू शकतात. प्रस्तावित बदलांमध्ये हलक्या व्यावसायिक वाहनांसाठी वजन मर्यादा ३,००० किलोवरून ३,५०० किलोपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे व्हॅन, पिकअप आणि लहान ट्रक एकसमान उत्सर्जन चाचणीच्या कक्षेत येणार आहेत. इंधनांच्या व्याख्या आणि मानके अद्ययावत करण्यात आल्या. हायड्रोजन प्लस सीएन ऐवजी हायड्रोजन प्लस सीएनजी असा बदल करण्यात आला असून, उत्सर्जन मोजमाप मिलीग्रॅम/किलोवॅट तास या स्वरूपात निश्चित करण्यात आले आहे.

## सोयाबीनचा ६ हजारांचा टप्पा पार



पुणे : नव्या हंगामाच्या तयारीत शेतकरी व्यस्त असतानाच बाजारपेठेत सोयाबीनच्या दरात लक्षणीय वाढ होत असल्याचे चित्र आहे. पश्चिम विदर्भातील प्रमुख कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये सोयाबीनचा कमाल दर ६ हजार रुपयांपर्यंत पोहोचला असून काही ठिकाणी ६,१०० रुपयांपर्यंत दर नोंदवले जात आहेत. अकोला, खामगाव, वाशीम आणि कारंजा या बाजारांमध्ये सध्या सोयाबीनचे दर ५,५०० ते ६,००० रुपयांदरम्यान आहेत.

अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनचा कमाल दर ६,०३० रुपये नोंदवण्यात आला, तर किमान दर ५,०५० रुपये होता. सरासरी दर सुमारे ५,९०० रुपयांवर पोहोचला. बाजारात सोयाबीनची आवक दीड ते दोन हजार पोत्यांची सुरु आहे. मागील आठवडाभरात दरात सातत्याने वाढ दिसून आली असून गेल्या तीन वर्षांतील मंदीनंतर ही सकारात्मक घडामोड मानली जात आहे. दरवाढीमागे यावर्षी उत्पादनात झालेली घट हे प्रमुख कारण असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. खरीप हंगामात पावसाचा अतिरेक, तसेच विविध नैसर्गिक आपत्तींमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. परिणामी बाजारातील आवक घटली आणि दरात वाढ झाली. याशिवाय आंतरराष्ट्रीय पातळीवरही परिस्थिती बदलत आहे. अमेरिका आणि ब्राझीलसारख्या प्रमुख सोयाबीन उत्पादक देशांमध्ये हवामानातील बदलांमुळे उत्पादन घटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याचा परिणाम स्थानिक बाजारावरही होत असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. मात्र, दरवाढ असूनही बहुतांश शेतकऱ्यांकडे विक्रीसाठी सोयाबीनचा साठा मर्यादित असल्याने या वाढीचा थेट लाभ सर्वांना मिळेलच असे नाही. आगामी काही दिवसांत दर आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात असली, तरी शेतकऱ्यांच्या हातात माल कमी असल्याने या तेजीचा फायदा मर्यादित राहण्याची शक्यता आहे.

## गाई, म्हशींतील दुग्धज्वराची लक्षणे, कारणे

उच्च दूध उत्पादन आणि आहारातील पोषणतत्त्वांच्या कमतरतेमुळे उत्पादकतेशी निगडित दुधाळ जनावरांमध्ये विविध चयापचयाचे आजार होतात. यामध्ये प्रामुख्याने आढळणारा आजार म्हणजे दुग्धज्वर. हा आजार प्रामुख्याने जास्त दूध देणाऱ्या संकरित गाई आणि म्हशींमध्ये आढळून येतो.

आजाराचा प्रादुर्भाव साधारणपणे व्यायल्यानंतर पहिल्या ७२ तासांपर्यंत जास्त प्रमाणात आढळून येतो. गाभण काळातील शेवटचा टप्पा व व्यायल्यानंतर जास्त दूध उत्पादनाचा काळ यामध्ये दुधाळ जनावरांची निगा, आरोग्य, आहार व व्यवस्थापन योग्यप्रकारे न करणे हे चयापचय आजार होण्यामागचे मुख्य कारण आहे. दुभत्या जनावरांमध्ये तिसऱ्या ते पाचव्या वेतामध्ये आजार दिसतो. पहिल्या किंवा दुसऱ्या वेतामध्ये जनावराची चाऱ्यातील क्षार शोषण्याची क्षमता तसेच हाडांमध्ये असलेले जास्त कॅल्शिअमचे प्रमाण यामुळे आजार होण्याचा धोका फार कमी असतो. आजार मुख्यत्वे संकरित गाई (५ ते ७ टक्के) आणि म्हशींमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. रक्तातील कॅल्शिअम कमतरतेमुळे आजार होतो. प्रसूतीनंतर दूध देण्याचा कालावधी तसेच चीक आणि दूध उत्पादनासाठी कॅल्शिअमची मागणी शरीराच्या कॅल्शिअम पुरवठा करण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त असते, तेव्हा आजार दिसतो. गाय आणि म्हैस व्यायल्यानंतर ४८ ते ७२ तासांच्या आत अचानक कॅल्शिअमचे प्रमाण कमी होते. व्यायल्यानंतर १ ते ३ दिवसांत आजाराची लक्षणे दिसतात. जनावर अस्वस्थता आणि अशक्तपणा येऊन खाली बसते. दुधाळ गायी, म्हशींमध्ये कॅल्शिअमची सामान्य पातळी ८-१२ मिलि/डीएल असते. जेव्हा ही पातळी ५.५ मिलि/डीएल पेक्षा कमी होते, तेव्हा आजाराची लक्षणे दिसतात. शरीरातील उर्वरित कॅल्शिअम स्नायूंमधून वापरले जाते. यामुळे शेवटी पक्षाघात आणि मज्जासंस्थेच्या अति उत्तेजनाची लक्षणे दिसून येतात. आहारातील कॅटायन आणि अनायन असंतुलनामुळे दुग्धज्वर होतो. उच्च डी कॅड असलेले पशुखाद्य आहारामध्ये आल्यास या आजाराची शक्यता वाढवते. आहारामध्ये नकारात्मक डी कॅड हा आजार रोखू शकते. विण्यापूर्वी आहारामधील कॅल्शिअम सामग्रीऐवजी डी कॅड कमी करणे, ही आजार टाळण्याचा उपाय आहे. कारण कॅल्शिअमचे प्रमाण कमी करण्यासाठी भाकड गायींना जास्त खुराक किंवा तृणधान्ये खायला देणे घातक ठरू शकते. यामुळे गाईंना फॅटी लिव्हर सिंड्रोम, किटन बाधा, अतिरिक्त ऊर्जेच्या घनतेमुळे पोट सरकणे यांसारख्या इतर गुंतागुंत होण्याची शक्यता असते.

डी कॅडचे संतुलन राहण्याकरिता प्रसूतिपूर्व गायींच्या आहारामध्ये ॲनिओनिक क्षार (म्हणजे क्लोराइड, सल्फर किंवा फॉस्फरसचे क्षार) पुरवठा केल्याने ही परिस्थिती टाळता येते. सामान्यतः दुभत्या गायींच्या आहारामध्ये डी कॅडची पातळी +१०० ते +२०० / असते. ॲनिओनिक क्षार किंवा आहारामध्ये खनिज आम्ल जोडल्याने डी कॅड पातळी घटते आणि दुग्धज्वराचे प्रमाण कमी होते. हा आजार मुख्यतः माफक हिरवा चारा उपलब्ध नसल्यामुळे आणि व्यायल्यानंतर उच्च दूध उत्पादन असणाऱ्या जनावरांमध्ये बघायला मिळतो. चीकामधील कॅल्शिअम रक्त पुरवठ्यापेक्षा आठ ते दहा पट जास्त असू शकते. हे प्रमाण रक्तामध्ये हाडांमधून सोडलेल्या कॅल्शिअमपेक्षा जास्त असते. म्हणून रक्तामधील कॅल्शिअमचे प्रमाण कमी होते.अशा जनावरास दुग्धज्वर होतो. याव्यतिरिक्त, इतर चयापचय विकारांमुळे क्लिनिकल आणि सबक्लिनिकल हायपोकॅलेसिमिया होऊ शकतो (म्हणजे बद्धकोष्ठता होणे, पोट सरकणे, जार अडकणे, गर्भाशय विकार, गर्भाशयस्नायू दाह आणि किटन बाधा (केटोसिस).

## मका पिकावरील कीड-रोग व एकात्मिक व्यवस्थापन

महाराष्ट्र राज्यात मका हे पीक प्रामुख्याने नाशिक, धुळे, कोल्हापुर, औरंगाबाद, उस्मानाबाद, जालना, बुलढाणा, नंदुरबार आणि सोलापूर या जिल्हयात मोठ्या प्रमाणात घेतले जाते. मक्याचा वापर मुख्यत्वे अन्नधान्य, पशुखादय, पोल्ट्रीखादय तसेच इतर मुल्यवर्धित खादयपदार्थासाठी होतो. मका पिकामध्ये कार्बोदके तयार करण्याची जास्त क्षमता असल्याने इतर तृणधान्यांपेक्षा उत्पादन क्षमता जास्त आहे. सदर पिकामध्ये ६०.६८ टक्के स्टार्च, ७.१५ टक्के प्रथिने, ४.५ टक्के स्निग्ध पदार्थ, ६ टक्के साखर व २.५ टक्के क्रुड फायबर असून इतरही उपयोगामुळे महाराष्ट्र राज्यात मका पिकाखालील क्षेत्र दिवसेंदिवस वाढतच आहे. मक्यावर येणाऱ्या विविध किडींपैकी अमेरिकन लष्करी अळी ही एक महत्वाची किड असून सदर किडीमुळे मका पिकाचे ५ ते ९० टक्क्यांपर्यंत नुकसान होवू शकते म्हणून या किडीचे वेळीच एकात्मिक व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.



अमेरिकन लष्करी अळी : महाराष्ट्रात सप्टेंबर २०१८ मध्ये सर्वप्रथम सोलापुर मधिल तांदुळवाडी या ठिकाणी या किडीची नोंद झाली. त्यानंतर पूर्ण महाराष्ट्रभर विविध पिकांवर या किडीचा प्रादुर्भाव दिसू लागला. हि कीड पिकांसाठी जास्त नुकसानकारक आहे. ही कीड वातावरणानुसार व ऋतुनुसार जीवनचक्रात बदल करते. सदर किडीच्या पतंगांची संख्या एप्रिल ते डिसेंबर महिन्यांपर्यत विपूल प्रमाणात असते.

एकात्मिक व्यवस्थापन : किडग्रस्त पिकाच्या शेतात खोल नांगरणी करावी. तुर, मुग व उडीद ही कडधान्य आंतरपीक म्हणून घ्यावीत. एकरी १० पक्षी थांबे लावावे तर पतंग अडकण्यासाठी हेक्टरी १५ कामगंध सापळे लावावे. पतंग आकर्षित करण्यासाठी प्रकाश सापळे वापरावेत. मक्याच्या पानावर दिसणारे अंडीपुंज व अळया हाताने वेचून रॉकेल मिश्रीत पाण्यामध्ये टाकुन नष्ट कराव्यात. किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच पोंग्यामध्ये वाळू टाकावी. त्यामुळे झाडाचा वाढीचा भाग खाण्यापासून परावृत्त करता येईल व शेंडा तुटणार नाही. अंडयावर उपजीवीका करणाऱ्या ट्रायकोग्रामा परोपजीवी किटकाची हेक्टरी ५०,००० अंडी १० दिवसाच्या अंतराने शेतात ३ वेळा सोडावीत. तसेच टेलेनोमस रेमस या परोपजीवी किटकांची एकरी ५० हजार अंडी शेतात सोडावीत लवकर पक्व होणाऱ्या वाणाची निवड करुन लवकर पेरणी करावी व याचा गावपातळीवर अवलंब करावा. जेणेकरून किडीला सतत खादय उपलब्धता होणार नाही व किडीची साखळी तोडण्यास मदत होईल. किडीस प्रतिकारक्षम वाणांची निवड करावी. जैविक उपाययोजनामध्ये मेटारायझियम ॲनिसोपलीची ७५ ग्रॅम प्रति पंप याप्रमाणे किडग्रस्त शेतात फवारणी करावी. तसेच नोमुरीया रीलाय या बुरशीजन्य किटकनाशकाची २ ते ३ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी. अळीच्या वाढीच्या लवकरच्या अवस्थांमध्ये निमअर्क १५०० पी.पी.एम. किंवा निंबोळी अर्क ५ टक्के यांची ५ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

खोडकीड : या किडीचे वैशिष्ट म्हणजे अळीच्या पाठीवर काळया ठिपक्यांचे पट्टे असून डोके गडद रंगाचे असते. नावाप्रमाणे या किडीचा नुकसानीचा प्रकार म्हणजे खोडाला आतुन पोखरने. किडीची अळीअवस्था नुकसानकारक आहे. अळी पानांना समान रेषेत छिद्र करुन खोडाच्या आतील भाग पोखरते. त्यामुळे पोंगा पुर्ण वाळतो. पिकाची रोपावस्था किडीला बळी पडणारी आहे. मका पिकाची उगवण झाल्यावर जवळपास चौथ्या आठवडयानंतर किडीचा प्रादुर्भाव सुरु होतो.

एकात्मिक व्यवस्थापन : शेतातील काडीकचरा धसकटे स्वच्छ करावी कारण त्यामध्ये अळी सुप्तावस्थेत जाते. प्रादुर्भावग्रस्त शेतातील चारा हंगामापुर्वीच जनावरांना खावू घालावा. पोंगेमर दिसताच मक्याचे झाड उपटून जाळून नष्ट करावे. किडीच्या पतंगाला आकर्षित करुन मारण्यासाठी हेक्टरी २ प्रकाश सापळ्यांचा वापर करावा. मका पिकात ४ ओळी मका व १ ओळ चवळी असे आंतरपिक म्हणून लागवड केल्यास खोडकिडीचा प्रादुर्भाव कमी होतो. किडीच्या जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चिलोनिस या परोपजीवी मित्र किटकाची ८ ट्रायको कार्ड प्रति हेक्टर मका उगवणीनंतर ११ आणि २४ व्या दिवशी पानांखाली लावावेत. उगवणीनंतर १५ दिवसांनी निंबोळी अर्क ५% ची फवारणी करावी. किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त दिसल्यास डायमिथोयेट ३० ई.सी. १-२ मिली १ लिटर पाण्यातुन फवारावे.

खोडमाशी : ही कीड घरमाशीसारखी पण आकाराने लहान असते. तिची लांबी ५ मि.मी असून रंग गडद असतो. अळी अवस्था फिक्कट पिवळया रंगाची असते. मादी माशी १५ ते २५ अंडी कोवळया पानांखाली किंवा खोडाच्या तळाशी घालते. अंडी उबवून अळी अवस्था ७ ते १० दिवसाची असते. पूर्ण वाढ झालेली अळी खोडात किंवा जमिनीत कोषावस्थेत जाते. कोषावस्था एक आठवडयाची असून कोषातून बाहेर पडलेली माशी ३-६ दिवस जगते. या किडीचा एकुण जीवनक्रम २१ ते २७ दिवसात पुर्ण होतो.

एकात्मक व्यवस्थापन : बियाण्याचे प्रमाण वाढवून प्रादुर्भावग्रस्त रोपे वेळीच उपटुन नष्ट करावीत. पेरणीपुर्वी थायमिथॉक्झाम १० ग्रॅम किंवा इमिडाक्लोपराईड १० ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. आर्थिक नुकसान पातळी गाठताच डायमिथोएट २० मिली. १० लि. पाण्यातून फवारणी करावी. पीक काढणीनंतर शेतातील अवशेष जाळून नष्ट करुन खोल नांगरट करावी. जेणेकरुन किडीची सुप्तावस्था नष्ट होईल,

कणसे पोखरणारी अळी : या किडीस बळी पडणारी पिकाची अवस्था म्हणजे केसर अवस्था होय. या किडीचे पतंग मध्यम आकाराचे मळकट पिवळे करडया रंगाचे असतात. या किडीची अळी हिरव्या असून ३८ ते ५० मी.मी. लांब असते. अळया कणसातील दाण्यांवर उपजीविका साधतात. त्यामुळे उत्पादनावर परिणाम होतो.

एकात्मीक व्यवस्थापन : एच.ए.एन.पी.व्ही. २५० एल.ई. प्रती हेक्टरी वापरावे. सुरवातीला निंबोळी अर्क ५ % उगवणीनंतर १५ दिवसांनी फवारणी करावी. किडीने आर्थिक नुकसान पातळी गाठल्यास रासायनिक किटकनाशकाची फवारणी घ्यावी. ५ मिली स्पिनेटोरम ११.७% एस.सी. प्रति १० लिटर पाण्यातून १५ दिवसांच्या अतराने दोन फवारण्या घ्याव्यात. प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यास इमामेक्टीन बेन्झोएट ५ एस.जी. ५ ग्रॅम किंवा क्लोरॅन्ट्रनिलिप्रोल १८. ५० एस.सी. ४ मिली प्रति १० लि. पाण्यात फवारावे.

गुलाबी अळी : पिकाच्या सर्वच अवस्थेत गुलाबी अळीचा प्रादुर्भाव होऊ शकतो. ही अळी गुलाबी रंगाची असून डोके तपकिरी रंगाचे असते. सुरुवातीला अळी पानांवर लांब निमुळते छिद्र पाडते. कणीस भरण्याच्या अवस्थेत कणसातील दाणे खाते. या किडीच्या व्यवस्थापनासाठी शेत नेहमी स्वच्छ ठेवावे. पक्षी थांबे, प्रकाश सापळे, कामगंध सापळे वापरावेत. पुर्ण वाळलेली सुरळी उपटुन नष्ट करावी. जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चीलोनिस या परोपजीवी किटकांचे अंडी असलेले ८ कार्ड प्रती हेक्टर लालावेत तसेच ५ टक्के निंबोळी अर्क व गरज असल्यास रासायनिक किटकनाशकांची फवारणी करावी. मावा : मावा ही एक रसशोषक किड असून पानाच्या खालच्या बाजूला राहुन पानातील रस शोषण करते. त्यामुळे पाने सुकतात पिवळी पडतात व कडा वाळून पानाचा द्रोन सारखा आकार होतो. माव्याच्या शरीरातून चिकट द्रव पानावर सोडला जातो. त्यामुळे काळी कॅप्नोडीयम बुरशी वाढून पाने काळी होतात. प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते. एकंदरीत झाड पिवळे पडून सुकायला लागते. यामुळे उत्पन्नात घट येते. मावा किडीच्या नियंत्रणासाठी प्रतिकारक्षम आणि सहनशील वाणांची निवड करावी. किडीला अनुकुल हवामान म्हणजे थंडी, प्रादुर्भावाची उच्च पातळी आणि पिकांची कोवळी अवस्था या एकत्र येणार नाही याची काळजी घ्यावी. मका पिकाभोवती चवळीची लागवड केल्यास बाहेरुन येणारा मावा त्यावर स्थिरावतो. नत्रयुक्त खताची मात्रा जास्त होणार नाही याची काळजी घ्यावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२९ : घाघरा येथील युद्धात मुघल सम्राट बाबर यांनी बंगाल आणि बिहारच्या शासकांचा पराभव केला.
१५३६ : इंग्लंडचे राजा हेनरी अष्टम यांनी प्रत्येक गीरीजाघरात बाईबल हे धार्मिक पुस्तक ठेवण्यास सांगितले.
१५४२ : सेंट फ्रान्सिस झेव्हिअर तत्कालीन पोर्तुगीज गोव्याची राजधानी ओल्ड गोवा येथे पोहोचला.
१६३२ : शहाजहान बादशहा व आदिलशहा यांच्यामधे शहाजीला पराभूत करण्याबद्दल तह झाला.
१८१८ : वैशाख शु. १ शके १७४० राजधानी रायगड लढवत असताना शेवटच्या बाजीरावाची पत्नी वाराणशीबाई इंग्रजांकडून पराभूत झाली.
१८३५ : अमेरिकन वर्तमानपत्र न्यूयॉर्क हेरॉल्ड चे प्रकाशण करण्यास सुरुवात झाली.
१८४० : एक पेनी किमतीचे 'पेनी ब्लॅक' नावाचे जगातील पहिले टपाल तिकीट इंग्लंडमध्ये विक्रीसाठी खुले झाले. हे तिकीट १ मे १८४० रोजी जारी झाले होते.
१८८९ : पॅरिसमधील 'आयफेल टॉवर'चे उद्घाटन झाले.
१९१० : ब्रिटीश शासक एडवर्ड सप्तम यांच्या निधनानंतर त्यांची गाद्दी त्यांचे पुत्र जॉर्ज पंचम यांनी सांभाळली.
१९४४ : पुणे येथील आगा खान पॅलेस मधून महात्मा गांधी यांची सुटका झाली.
१९४९ : ईडीएसएसी पहिले इलेक्ट्रॉनिक डिजिटल संचयित संगणक सॉफ्टवेअर सुरु झाले.
१९५४ : रॉजर बॅनिस्टर हे १ मैल चार मिनिटांच्या आत धावणारे पाहिले व्यक्ती ठरले.
१९८३ : अडोल्फ हिटलर यांच्या डायरीचा लबाडी म्हणून खुलासा केला गेला.
१९९४ : इंग्लंडची राणी एलिझाबेथ (दुसरी) आणि फ्रान्सचे अध्यक्ष फ्रँकॉइस मित्राँ यांच्या हस्ते इंग्लिश खाडीखालुन जाणार्या आणि इंग्लंड व फ्रान्स यांना जोडणार्या 'युरो टनेल'चे उद्घाटन झाले.
१९९७ : 'बँक ऑफ इंग्लंड'ला स्वायत्तता देण्यात आली.
१९९९ : महाराष्ट्र राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांत महिलांना तीस टक्के आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला. अस निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.
२००१ : पोप जॉन पॉल (दुसरे) यांनी सिरीयातील एका मशिदीस भेट दिली. मशिदीस भेट देणारे ते पहिलेच पोप होत.
२००२ : भूपिंदर नाथ किरपाल यांनी भारताचे ३१ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२०१५ : सलमान खान यांना सदोष मनुष्यवधाच्या आरोपास दोषी ठरवून ५ वर्ष्याच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच सलमान खान यांची हायकोर्टात अपील दाखल करून, जामिनावर सुटका.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : सिग्मंड फ्रॉईड ऑस्ट्रियन मानसशास्त्रज्ञ, आधुनिक मानसशास्त्राचा जनक (मृत्यू: २३ सप्टेंबर १९३९)
१८६१ : मोतीलाल गंगाधर नेहरू भारतीय स्वातंत्र्यसेनानी, स्वराज्य पक्षाचे संस्थापक सदस्य, कायदेपंडित (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९३१)
१९२० : बुलो चंदीराम रामचंदानी ऊर्फ बुलो सी. रानी जुन्या पिढीतील संगीतकार व गायक (मृत्यू: २४ मे १९९३ मुंबई)
१९४० : प्रसिद्ध महिला तबलावादक, गायिका आणि संगीतज्ञ अबन मिस्त्री यांचा जन्म.
१९४३ : लेखिका वीणा चंद्रकांत गावाणकर यांचा जन्म.
१९५१ : लीला सॅमसन भरतनाट्यम नर्तिका, नृत्यदिग्दर्शिका आणि लेखिका. संगीत नाटक अकादमी आणि फिल्म सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षा
१९५३ : टोनी ब्लेअर ब्रिटनचे पंतप्रधान आणि मजूर पक्षाचे अध्यक्ष १९६४: अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय जलतरणपटू खजान सिंह यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५८९ : रामतनू पांडे ऊर्फ मोहमाद आट्टा खान तथा संगीतसम्राट तानसेन अकबराच्या दरबारातील एक नवरत्न (जन्म: १५०६)
१८६२ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (जन्म: १२ जुलै १८१७)
१९२२ : छत्रपती शाहू महाराज सामाजिक सुधारणांचे कृतीशील पुरस्कर्ते, कला, नाटक, संगीत यांचे प्रोत्साहक (जन्म: २६ जून १८७४)
१९४६ : भुलाभाई देसाई स्वातंत्र्यसेनानी व कायदेपंडित, त्यांनी होमरुल चळवळीतील कार्यकर्ते, १९३१ मधे 'गांधी-आयर्विन' कराराप्रमाणे त्यांनी बार्डोलीच्या शेतकर्यांची बाजू मांडली. १९३२ मध्ये कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांना एक वर्षाचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली होती. (जन्म: १३ आक्टोबर १८७७)
१९५२ : मारिया मॉंटेसरी इटालियन डॉक्टर व शिक्षणतज्ञ. पूर्वप्राथमिक शिक्षणाविषयीच्या त्यांच्या उपक्रमामुळे तशा शाळा 'मॉंटेसरी' या नावाने ओळखल्या जातात. (जन्म: ३१ ऑगस्ट १८७०)
१९६६ : रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे भारतातील पहिले सिनिअर रँग्लर, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री, भारताचे ऑस्ट्रेलियातील उच्चायुक्त (जन्म: १६ फेब्रुवारी १८७६)
१९९५ : आचार्य गोविंदराव गोसावी प्रवचनकार, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, हैदराबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक.
१९९९ : कृष्णाजी शंकर हिंगवे पुणे विद्यापीठातील जयकर ग्रंथालयाचे पहिले ग्रंथपाल व संस्थापक सदस्य.
२००१ : विख्यात मराठी कादंबरीकार, लेखिका मालतीबाई बेडेकर यांचे पुणे येथे निधन.
२००६ : जगातील सर्वात मोठे प्रवासी जहाज टायटनिक च्या दुर्घटनेचे साक्षीदार अमेरिकन नागरिक लिलियन एस्प्लंट यांचे निधन.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# जालन्यात नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या बटन गोळ्याची तस्करी



जालना। प्रतिनिधी

पोलीस ठाणे कदीम हद्दीत नुतन वसाहत जुना जालना ब्रिजखाली साईकिर्ती हॉटेल समोर गुप्त बातमीदार यांचे कडुन बातमी मिळाली कि, सय्यद सलमान सय्यद गफार रा.वारवार गल्ली जुना जालना हा नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या वटन गोळयाची विक्री करित आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाल्यावरुन पोलीस तसेच अन्न औषध प्रशासन विभाग जालनाचे अधिकारी असे दोन पंचासह वातमीच्या ठिकाणी नुतन वसाहत जुना जालना ब्रिजखाली साईकिर्ती हॉटेल समोर जावुन छापा टाकला असता सदर ठिकाणी एक इसम मिळुन आल्याने त्यास आम्ही पोलीसांची व अन्न प्रशासन अधिकारी व पंचाची ओळख देवुन त्यांचे नाव गावं विचारणा केली असता त्याने त्याचे नाव सव्यद सलमान सय्यद गफार रा. बारवार गल्ली जुना जालना असे सांगितल्याने त्यास ताव्यात घेवुन कायदयान्वये छापा कारवाईचा उद्देश कळवुन त्याची सोवत असलेल्या पंचा समक्ष अंगझडती घेतली असता त्याचे ताव्यात औषधी ०.५, ०.५. ०.५ व ०.५ या (टॅबलेट) पाकिटे ड्रग्स (वटन गोळी) प्रकारात मोडतात व त्यातील हा प्रतिबंधीत घटक ज्याचा गुंगीकारक आणि नशेसाठी गैरवापर होवुन मानवी जिवितास व शरिरास अपायकारक असल्याचे अन्न औषधी प्रशासन अधिकारी यांनी सांगितले आहे. त्यानंतर आम्ही सदर इसमास औषधी चे बिल आहे काय तसेच विक्री परवाना किंवा डॉक्टरांनी लिहून दिलेले प्रिस्क्रीपान आहे काय असे विचारणा केली असता त्यानी नाही असे सांगितले आहे. सदर प्रतिबंधीत घटक असलेल्या गोळया कोठुन आणल्या असे विचारले असता त्याने एका इसमाचे नाव सांगुन समाधान कारक उत्तर दिले नाही. सदर इसमा कडुन नशेसाठी वापर होणाऱ्या हा घटक असणाऱ्या एकुण २९ पाकिट ३२५ टॅबलेट (वटन गोळी) असे पुढील तपासकामी जप्त केले असुन सदर प्रकरणा मध्ये नमुद आरोपी विरुध्द पोलीस ठाणे कदीम जालना येथे गुन्हा दाखल करण्यात येवुन दुसऱ्या फरार आरोपी चा शोध घेण्यासाठी पथक रवाना करण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई मा.श्री. अजय कुमार बसंल, पोलीस अधीक्षक , मा.श्री. आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक जालना, मा. श्री. अनंत कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधीकारी जालना यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, कदीम जालना , सहा. आयुक्त श्री. जिवन जायव अन्न व औषधी प्रशासन यांनी केली.

## वाशी पोलिसांकडून चोरीची मोटारसायकल जप्त; एक ताब्यात



वाशी। प्रतिनिधी

वाशी पोलीस स्टेशनच्या पथकाने रात्रीच्या गस्तीदरम्यान चोरीची मोटारसायकल जप्त करून एका आरोपीस ताब्यात घेतले असून दुसरा आरोपी फरार झाला आहे. दि. २९/०४/२०२६ रोजी रात्रीच्या सुमारास पोलीस स्टेशन वाशी येथील पोलीस निरीक्षक शंकर शिंदे, पोलीस हवालदार बळीराम यादव, पोलीस कॉन्स्टेबल विठ्ठल मलंगनेर, दादासाहेब औसारे व सपोफौ दिलीप होंडे हे पोलीस कर्मचारी हद्दीत नियमित पेट्रोलिंग करत असताना पिंपळगाव पाटी परिसरात विनानंबर प्लेट असलेल्या मोटारसायकलवर दोन इसम संशयास्पदरित्या फिरताना आढळून आले. पोलिसांनी त्यांना थांबविण्याचा इशारा केला असता त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला.

पोलीस पथकाने पाठलाग करून मोटारसायकल अडविली. यावेळी एक आरोपी ताब्यात घेण्यात आला, तर दुसरा आरोपी अंधाराचा फायदा घेऊन फरार झाला. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीने आपले नाव भागवत पंजा शिंदे असे सांगितले असून फरार आरोपीचे नाव बबलू रामा शिंदे असे समोर आले आहे. तपासादरम्यान संबंधित मोटारसायकल आंबेजोगाई शहर पोलीस ठाणे गु.र.नं. १५०/२०२६, कलम ३०३(२) बी.एन.एस. मधील चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मिळून आलेला आरोपी तसेच जप्त करण्यात आलेली मोटारसायकल पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी आंबेजोगाई पोलीसांच्या ताब्यात देण्यात आली आहे. फरार आरोपीचा शोध सुरू असून पुढील तपास करण्यात येत आहे. वरील कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोकर, मा. अप्पर पोलीस अधीक्षक शफकत आमना व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शंकर शिंदे, पोलीस हवालदार बळीराम यादव, पोलीस कॉन्स्टेबल विठ्ठल मलंगनेर, दादासाहेब औसारे व चासपोफौ दिलीप व्हंडे यांनी केली.

## दिव्यांगांच्या हितासाठी प्रशासनाचे सकारात्मक पाऊल

### जिल्हाधिकारी यांच्याकडून दिव्यांग पुनर्वसन केंद्राची पाहणी



जालना। प्रतिनिधी

जालना शहरातील गांधी चमन परिसरात सुरू होत असलेल्या दिव्यांग पुनर्वसन केंद्राला जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज भेट देवून केंद्राच्या पूर्वतयारीची पाहणी केली. दिव्यांग बांधवांच्या विकासासाठी आणि त्यांना सक्षम व आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्देशाने उभारण्यात येत असलेल्या या केंद्रामुळे जिल्ह्यातील दिव्यांगांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केंद्रातील सुविधा, उपलब्ध होणाऱ्या सेवा तसेच सुरू असलेल्या कामांचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. दिव्यांगांना दर्जेदार सेवा आणि आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रशासनाकडून पूर्ण सहकार्य केले जाईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. गांधी चमन येथील मध्यवर्ती ठिकाणी सुरू होणाऱ्या या दिव्यांग पुनर्वसन केंद्रामध्ये दिव्यांगांसाठी समुपदेशन, प्रशिक्षण, पुनर्वसन आणि विविध मार्गदर्शन सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या केंद्रामुळे दिव्यांगांच्या जीवनमानात सकारात्मक बदल होण्यास मदत होणार असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.येणाऱ्या १ मे रोजी जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते या दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे उद्घाटन होणार आहे. उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून तयारीला वेग देण्यात आला असून जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या भेटीमुळे कामकाजाला अधिक गती मिळाल्याचे दिसून येत आहे. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी प्रशासनाकडून उचलले जात असलेले हे पाऊल समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, सामाजिक बांधिलकी जपणारा महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणून या केंद्राकडे पाहिले जात आहे.

## पुर्णवादी नागरिक सहकारी बँकेचा ८ कोटीचा घोटाळ्या प्रकरणी मुख्य आरोपीस अटक

जालना। प्रतिनिधी

पुर्णवादी नागरिक सहकारी बँकेचे शाखा अधिकारी व पंचमुखी वेअरहाऊसचे मालक यांनी संगणमत करुन बनावट कागदपत्रांच्या आधारे वेअर हाऊस च्या नावे १६६ बनावट खातेदारांच्या माध्यमातुन ८ कोटी १२ लाख ९३ हजार रुपयांची फसवणूक केल्या बाबत बॅकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुर्णवादी नागरिक सहकारी बँक यांचे फिर्यादवरुन कदीम जालना पोलीस स्टेशन येथे नमूद प्रकरणात गु.र.नं. ४६५/२०२६ कलम ३१६(२), ३१८(४), ३३६(३), ३३८, ३४०(२), ६१(२),३(५) २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे सदर बँकेमध्ये अपहार झाल्याने व सदर अपहाराची रक्कम मोठ्या प्रमाणात असल्याने गुन्ह्याची व्याप्ती बघून मा. पोलीस अधीक्षक जालना यांनी सखोल तपास करण्या बाबतचे आदेश आर्थिक गुन्हे शाखेला दिलेले आहेत.

मा. पोलीस अधिक्षक व अपर पोलीस अधीक्षक यांचे आदेशाने गुन्हयातील आरोपीचा शोध घेत गोपणीय माहीती अधारे व त्रांत्रीक विश्लेषणा आधारे पाठलाग करत आरोपी नामे शिरीष कमलाकर देवळे वय ५३ वर्षे, रा. महादेव मंदीर जवळ निळकंठ नगर जुना जालना हा अंबड चौफुली जवळ आज संध्याकाळी अटक करण्यात आला आहे.

सादर गुन्ह्यातील इतर आरोपीतांची नावे निष्पन्न करुन आरोपीतांचा शोध सुरू आहे. सदर कामगीरी ही मा. श्री. अजयकुमार बन्सल पोलीस अधीक्षक , श्री. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक जालना, श्री.सुरेश उनवणे प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिथुन घुगे सहा. पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा जालना, शैलेश म्हस्के, पोलीस उप निरीक्षक, आणि पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजु भोसले, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार, जयश्री निकम, मंदा नाटकर यांनी पार पाडली.

## रायझिंग जालना सोहळ्याचे उद्घाटन

जालना । प्रतिनिधी

'महाराष्ट्र दिन' १ मे रोजी जालना जिल्हा स्थापनेला ४५ वर्ष पुर्ण होत आहे. या अनुषंगाने जालना जिल्हा प्रशासनामार्फत 'रायझिंग जालना' हा सोहळा साजरा करण्यात येणार आहे. 'रायझिंग जालना' सोहळ्याचे आयोजन जालना शहरातील अग्रसेन भवन येथे करण्यात येणार आहे. या सोहळ्याचे उद्घाटन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथराव मुंडे यांच्या हस्ते १ मे रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. यावेळी सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे

'रायझिंग जालना' सोहळ्यामध्ये जालना जिल्ह्याच्या मागील ४५ वर्षांच्या वाटचाली अनुषंगाने आयोजित प्रदर्शनी मध्ये जालना जिल्ह्याच्या विशेष बाबींवर भर देण्यात येणार आहे. तसेच विविध विभागांचे उल्लेखनीय काम स्टॉलच्या माध्यमातून दाखवण्यात येणार असुन, यात विविध बचत गटांच्या स्टॉलचा देखील समावेश राहणार आहे. या सोहळ्यात जिल्ह्यातील जास्तीत-जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम

जालना। प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

पालकमंत्री श्रीमती मुंडे यांचे बुधवार, दि. ३० एप्रिल, २०२६ रोजी दुपारी ३.४५ वाजता शासकीय विश्रामगृह जालना येथे आगमन व राखीव. सायंकाळी ४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण. सायंकाळी ४.१० ते सायंकाळी ५.२५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित खरीप हंगाम २०२६ पुर्व तयारी आढावा बैठक/ पाणी टंचाई आढावा बैठक/जिल्हास्तरीय जन आरोग्य संरक्षण कार्यकारीणी बैठकीस उपस्थिती, सायंकाळी ५.३० ते सायंकाळी ६.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील पालकमंत्री यांच्या दालनात जनता दरबार (अभ्यंगतांच्या भेटी व नागरिकांशी संवाद), सायंकाळी ६.३५ वाजता विश्रामगृहाकडे प्रयाण करतील.

तसेच शुक्रवार, दि. १ मे, २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता पोलीस परेड ग्राऊंड येथे आयोजित महाराष्ट्र दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहण व विविध कार्यक्रम तसेच जिल्हा पोलीस दलाच्या नवीन वाहनांचे लोकार्पण सोहळयास उपस्थिती. तसेच सकाळी ९.०० ते १०.४५ वाजता मोतीबाग चौपाटी (बदनापूर रोड) कडे प्रयाण, दिव्यांग केंद्राचे लोकर्पण स्थळ जिल्हा रुग्णालय शेजारी. सकाळी ११.०० वाजता अग्रेसन भवन येथे आयोजित ''रायझिंग जालना''या कार्यक्रमाच्या उद्घाटन सोहळयास उपस्थिती. दुपारी १.०० वाजता दैनिक दिव्य मराठी ग्रुपच्या वतीने आयोजित जालना पोलीस सन्मान सोहळयास उपस्थिती स्थळ हॉटेल अतिथी, मंठा रोड दुपारी २.१५ वाजता शासकीय वाहनाने परळी वैजनाथ जिल्हा बीडकडे प्रयाण करतील.

## चक्रीवादळामुळे सोलारचे नुकसान



अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील एकलहेरा येथे २८ एप्रिल रोजी अचानक चक्री वादळ वाऱ्यामुळे बलभीम अण्णासाहेब गवारे यांच्या शेतामध्ये गट क्रमांक १११ मध्ये जे के कंपनीचं सोलरची अचानक वादळ वाऱ्यामुळे दि २८ एप्रिल २०२६ रोजी सोलर वाकड तिकडं होऊन नुकसान झाली आहे. एकलहेरा येथील गवारे याची शेत जमीन असून त्या एकलहेरा शिवारात गट नंबर १११असून त्यांना जे के कंपनीचे सोलर बसण्यात आले होते.

२८ एप्रिल रोजी वादळे वारे झाल्यामुळे सोलारच्या वाकडं तिकडं होऊन पाट्या फुटल्याने नुकसान झाले आहे.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये १२० अतिक्रमणे जमीनदोस्त

### शहानुरमिया दर्गा रोडवरील फळविक्रेते, चायनीज चौपाटी हटवली; मनपाची कारवाई






छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने (मनपा) शहरातील अतिक्रमणांविरोधात धडक मोहीम तीव्र केली आहे. सलग दुसऱ्या दिवशीही मनपाच्या पथकाने शहरात कारवाई करत १२० अतिक्रमणे जमीनदोस्त केली. बुधवारी १४० अतिक्रमणे हटवण्यात आली होती. ही कारवाई वाढत्या अतिक्रमणांना आळा घालण्यासाठी आणि वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी करण्यात येत आहे.

आजची कारवाई प्रामुख्याने शहानूर मियां दर्गा परिसरापासून ते भाजीवाली बाई पुतळ्यापर्यंत राबवण्यात आली. यानंतर ही मोहीम आनंद गाढे चौकापर्यंत पुढे नेण्यात येणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

रस्त्यावर अनधिकृतपणे थाटण्यात आलेले फळविक्रेत्यांचे गाडे, शेड आणि चायनीज सेंटर्स या कारवाईत पूर्णपणे हटवण्यात आले. यामुळे रस्त्यावरील अडथळे दूर होऊन वाहतुकीसाठी रस्ता मोकळा झाला आहे. शहानूर मियां दर्गा परिसरात या कारवाईला काही स्थानिक आणि व्यावसायिकांनी विरोध केला.

त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र प्रशासनाने परिस्थितीवर नियंत्रण मिळवत कारवाई पूर्ण केली. मनपा उपआयुक्त संतोष वाहूळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या मोहिमेत १२० अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. अतिक्रमण विभागाच्या उपायुक्त सविता सोनवणे आणि त्यांच्या पथकाने रस्त्यावरील हे अनधिकृत अडथळे हटवून शहर मोकळे श्वास घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाची पावले उचलली आहेत.

यापुढेही रस्त्यावरील अतिक्रमणांवर अशीच कडक कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा मनपाकडून देण्यात आला आहे.

## ज़िल्हाधिकारी यांची जिल्हा ग्रंथालय कार्यालयास भेट



जालना। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज जिल्हा ग्रंथालय कार्यालय, जालना येथे भेट देऊन ग्रंथालयातील विविध सुविधा, पुस्तक संग्रह, वाचन व्यवस्था तसेच नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सेवांचा आढावा घेतला.

यावेळी जिल्हाधिकारी यांनी ग्रंथालयातील पुस्तक विभाग, संदर्भ विभाग, वाचन कक्ष तसेच नोंदवहीची पाहणी केली. ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या शैक्षणिक, स्पर्धा परीक्षा, साहित्यिक व संदर्भ पुस्तकांच्या व्यवस्थेबाबत माहिती घेतली. तसेच नागरिक व विद्यार्थ्यांना अधिकाधिक दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक सुधारणा व सुविधा वाढविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. ग्रंथालय हे ज्ञानवृद्धीचे महत्त्वपूर्ण केंद्र असून विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांनी ग्रंथालयाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौ. मित्तल यांनी यावेळी केले. या वेळी उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे या उपस्थित होत्या.

# आजपासून बीडमध्ये कृषी प्रदर्शनाला सुरुवात

## आ. पंडिताच्या हस्ते होणार उद्घाटन; पुरस्कार वितरणास कृषीमंत्री भरणे, महंत शिवाजी महाराज, रजनी पाटील, ज्योती मेटेची उपस्थिति

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या वर्षी प्रथमच बीड येथे दिनांक ०१ ते ०५ मे दरम्यान किसान कृषी महोत्सव हे कृषि प्रदर्शन संभाजी महाराज क्रीडांगण ( मल्टीपर्पज ग्राउंड )या मैदानात भव्य अशा ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आसल्याची माहिती आयोजन समितीचे मुख्य संयोजक महेश बेदरे, स्वागताध्यक्ष दिलीप गोरे , कार्याध्यक्ष शिवराम घोडके , निमंत्रक सुभाष साळवे जिल्हा कृषी अधीक्षक,मुख्य संयोजक महेश बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.आज मान्यवरच्या उपस्थितीत कृषी प्रदर्शनाचे सुरुवात होत आहे

मराठवाड्यातील शेतकर्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान च्या वतीने आयोजन केले असून प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन ओंकार साखर कारखाना , यांचा विशेष सहभाग या प्रदर्शनात असणार आहे. कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात तब्बल १५० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहेत. दि १ मे शुक्रवार रोजी सकाळी ११:१५ वा. गेवराईचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते व बीड नगर परिषद च्या नगर अध्यक्ष प्रेमलताताई पारवे यांच्या अध्यक्षतेखाली या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. तर प्रमुख अतिथी म्हणून बीडचे आमदार संदीप भैय्या क्षीरसागर हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राजुरेश्वर चव्हाण, अनिल जगताप, राजेंद्र मस्के, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, सचिन मुळक, स्वप्निल गलधर, मुजीब भाई, निजामभाई, फारुख पटेल, प्रवीण कुमार बांगर, भाऊसाहेब नाटकर, गणेश उगले, ऋषिकेश बेद्रे, राजेंद्र मोटे, गंगाधर काळकुटे, बळीराम गवते, चंद्रकांत नवले, सचिन उबाळे, अमर नाईकवाडे, चंद्रकांत नवले, बी. बी जाधव मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे तर दि ३ रोजी विविध तज्ज्ञांची चर्चासत्र होणार आहे दि. ४ मे सोमवार रोजी दुपारी १२.३० वाजता कृषिरत्न पुरस्कार वितरण सोहळा व भव्य शेतकरी मेळावा होणार आहे महाराष्ट्राचे कृषी मंत्री नामदार दत्तामामा भरणे यांच्या हस्ते होणार आहे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी खासदार रजनी ताई अशोकराव पाटील या असणार आहेत प्रमुख अतिथी म्हणून नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज हे असणार आहेत या शेतकरी मेळाव्याला विशेष उपस्थिती म्हूणन कुलगुरू डॉ.इंद्रामणी , बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे उपस्थित राहणार आहेत विशेष उपस्थिती म्हणून शिवसंग्राम चे अध्यक्ष ज्योतीताई मेटे, गेवराईचे माजी आमदार अमरसिंह पंडित हे उपस्थित राहणार आहेत तर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेसाहेब देशमुख, शिव संग्राम चे जिल्हाध्यक्ष नारायण काशीद, संपादक गंमत भंडारी, अजित वरपे, दिलीप खिस्ती, शेख तय्यब, संतोष मानूरकर, सुनील शिरसागर,वसंत मुंडे, नरेंद्र कंकरिया, संजय मालानी ,बालाजी मारगुडे, कामरान शेख, जालिंदर धांडे,गणेश सावत, उत्तम हजारे,सुभाष चौरे, दिनेश लिंबेकर, अमोल मुळे आदि सर्व प्रसिद्धी माध्यमांच्या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे दि. ५ मे रोजी एक दिवशी डॉग शो व समारोप सोहळा होणार आहे. या प्रदर्शनात विविध शेती विषयावर चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार असून वरील सर्व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन व समारोप होणार आहे. तरी या प्रदर्शनाचा तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने संयोजक कृषिभूषण महेश बेदरे, ,स्वागताध्यक्ष दिलीपराव गोरे , निमंत्रक ,कार्याध्यक्ष कृषीभूषण शिवराम घोडके , स्वागत समिती प्रमुख गणेश बजगुडे, चंद्रकांत नवले , निमंत्रक जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे ,स्वागत समिती प्रमुख रमेश सानप, संभाजी जाधव,पुरस्कार समिती प्रमुख सुभाषराव सपकाळ , मान्यवर स्वागत समिती प्रमुख बंडू जटाळ, ॲड. गणेश करांडे ,नियोजन समिती प्रमुख कैलास रकटे, राहुल टेकाळे, गणेश राऊत,व्यवस्थापन समिती प्रमुख शिवाजीराव जाधव, अशोक कागदे, बलभीमराव बोरवडे,पशुप्रदर्शन समिती डॉ.संभाजी जाधव यांनी केले आहे



# गेवराईत अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर पोलिसांचा छापा; १३ लाखांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी अवैध धंद्यांविरुद्ध पुकारलेल्या मोहिमेअंतर्गत गेवराई पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. म्हाळसपिंपळगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रातून विना परवाना वाळू उपसा करणाऱ्या दोन ट्रॅक्टरवर पोलिसांनी आज सकाळी छापा टाकून १३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांविरुद्ध कारवाईचे नियोजन केले होते. त्यानुसार आज, ३० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:१० वाजेच्या सुमारास पोलीस पथकाने म्हाळसपिंपळगाव शिवारात अचानक छापा टाकला. या ◀◀ पान ३ वर

# माजलगाव अत्याचार प्रकरणात गंभीर कलमांची वाढ

### सक्तीने धर्मांतराचे वृत्त खोटे, अफवांवर विश्वास न ठेवण्याचे पोलिसांचे आवाहन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरात २१ एप्रिल २०२६ रोजी एका अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणात पोलिसांनी तपासाअंती गुन्ह्याची व्याप्ती वाढवत अधिक गंभीर कलमे लागू केली आहेत. या प्रकरणातील विधीसंघर्षग्रस्त बालकाची रवानगी बीड येथील निरीक्षण गृहात करण्यात आली असून, पीडितेच्या सविस्तर जबाबानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. महत्त्वाचे म्हणजे, या गुन्ह्यात सक्तीने धर्मपरिवर्तन झाल्याचे कोणतेही पुरावे आतापर्यंतच्या तपासात आढळले नसल्याचे पोलिसांनी अधिकृतरीत्या स्पष्ट केले आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश भोसले यांनी दिलेल्या माहितीनुसार, माजलगाव शहर पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांक १२२/२६ मध्ये सुरुवातीला भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ७५, ७९ आणि पोक्सो कायद्याच्या कलम ८, १२ नुसार कारवाई करण्यात आली होती. मात्र, पिंक पथकाने केलेल्या सखोल तपासानंतर आणि पीडितेच्या नव्या जबाबामुळे आता या गुन्ह्यात कलम ६४(२)(एम), ६५, ३०८ आणि ३५१(२) बीएनएस सह पोक्सो कायद्याच्या कलम ४ व ६ या अत्यंत गंभीर कलमांचा समावेश करण्यात आला आहे. सध्या या प्रकरणाचा तांत्रिक आणि इतर पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे. पोलीस तपासात सक्तीने धर्मांतर झाल्याचा दावा सिद्ध करणारा कोणताही पुरावा अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे नागरिकांनी या प्रकरणाबाबत कोणत्याही सोशल मीडियावरील अफवांना बळी पडू नये, असे आवाहन बीड जिल्हा पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे. तपासात काही नवीन बाबी निष्पन्न झाल्यास त्या जनतेसमोर आणल्या जातील, तोपर्यंत शांतता राखण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# महा डायलिसीस योजनेअंतर्गत नवीन बारा डायलिसीस केंद्रांचे आज होणार लोकार्पण

### किडनी विकारग्रस्तांना दिलासा ;केज येथील केंद्राचा समावेश

मुंबई । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील किडनी विकारग्रस्त रुग्णांना शासकीय दवाखान्यात मोफत डायलिसीस सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या महाडायलिसीस योजनेचा राज्यात महाराष्ट्र दिनी विस्तार करण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते १ मे रोजी नवीन बारा डायलिसीस केंद्राचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

राज्यातील किडनी विकारग्रस्त नागरिकांना मोफत डायलिसीस सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'महाडायलिसीस' योजना सध्या विविध शासकीय रुग्णालयांत प्रभावीपणे राबवली जात आहे. या सुविधेमुळे राज्यातील हजारो किडनी विकारग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे.


ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा तसेच जिल्हा रुग्णालयांपर्यंत ही सेवा पोहोचवून ग्रामीण भागातील रुग्णांना घराजवळच नि:शुल्क उपचार मिळावेत, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण रुग्णालयांत किमान ५ बेड्स, तर उपजिल्हा व जिल्हा रुग्णालयांत ८ ते १० डायलिसीस बेड्सची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सध्या राज्यात ९२ महाडायलिसीस केंद्रे कार्यरत असून त्यामध्ये ५५८ डायलिसिस बेड्स उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र दिनी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते १२ नवीन केंद्रांचे लोकार्पण होणार असून, त्यामुळे एकूण केंद्रांची संख्या १०४ वर पोहोचणार आहे. या नव्या केंद्रांमध्ये दुर्गम भागातील रुग्णालयांचाही समावेश करण्यात आला आहे. ◀◀ पान ३ वर

# ईगलवूड इंग्लिश स्कूलचा दुहेरी मानाचा तुरा : नवोदय परीक्षेतही जिल्ह्यात प्रथम

माजलगाव । प्रतिनिधी

ईगलवूड इंग्लिश स्कूलने यंदाच्या शैक्षणिक वर्षात यशाची परंपरा अधिकच उजळवत दुहेरी मानाचा तुरा आपल्या शिरपेचात रोवला आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या उडइए दहावीच्या निकालात विद्यार्थिनी वाघ जान्हवी विठ्ठल हिने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत शाळेचा नावलौकिक उंचावला होता. या अभिमानास्पद कामगिरीनंतर आता पुन्हा एकदा शाळेने यशाची नवी उंची गाठली आहे.



जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत इयत्ता नववीतील विद्यार्थी परदेशी भावेश लक्ष्मीनारायण याने उत्तुंग यश संपादन करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्याच्या या भव्य यशामुळे ईगलवूड शाळेच्या गौरवशाली परंपरेत आणखी एक सुवर्णपान ◀◀ पान ३ वर

# दोन महिन्यानंतरही अल्पवयीन मुलीचा नेकनुर पोलिसांना शोध लागेना

### महाराष्ट्र दिनी पालकमंत्र्याच्या गाडीवर टमाटे फेकण्याचा पालकांचा इशारा

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील कानडी घाट येथील अल्पवयीन मुलगी गेल्या दोन महिन्यापासून बेपत्ता असून सदरील मुलीला अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेल्याची तक्रार गेल्या दोन महिन्यापूर्वी नेकनूर पोलीस ठाण्यात मुलीच्या पालकांनी तक्रार दिली आहे. अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवून नेलेल्या आरोपीचे नाव पोलिसांना मुलीच्या पालकांनी सांगूनही पोलिसांनी अद्याप पर्यंत मुलीचा शोध लावलेला नाही.

त्यामुळे मुलीच्या पालकांनी २८ एप्रिल मंगळवार रोजी नेकनूर पोलीस स्टेशन, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, पोलीस उपअधीक्षक केज, जिल्हा पोलीस अधीक्षक बीड, तहसीलदार बीड, जिल्हाधिकारी बीड यांना लेखी निवेदन देऊन त्या निवेदनात असे म्हटले आहे की, नेकनूर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत गोसावी व चौसाळा पोलीस चौकीचे पोलीस कर्मचारी सचिन मुरूमकर यांनी आरोपीच्या नातेवाईकांकडून पैसे घेऊन आरोपीला अभय देत आहेत. त्यामुळे वरील दोघांनाही निलंबित करावे आणि माझी मुलगी मला परत मिळवून द्यावी. अन्यथा १ मे महाराष्ट्र दिन या दिवशी पालकमंत्री बीड यांच्या गाडीवर सडलेले टमाटे फेकण्याचा इशारा मुलीच्या पालकांनी लेखी निवेदनात दिला आहे.

# सोमवारी आणि शुक्रवारी दारूची दुकाने कडकडीत बंद ठेवा!

### काँग्रेस गटनेते सय्यद फारुख यांची आक्रमक मागणी; नगरपालिकेत दिले निवेदन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी शहरातील सार्वजनिक शांतता, धार्मिक पावित्र्य आणि सर्वसामान्यांची सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी दर सोमवारी व शुक्रवारी दारू विक्री पूर्णपणे बंद ठेवावी, अशी आक्रमक मागणी काँग्रेसचे नगरपरिषदेतील गटनेते तथा नगरसेवक सय्यद फारुख गणी उर्फ बब्बू यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी आज नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले.

नगरपरिषद यांना दिलेल्या निवेदनात सय्यद फारुख यांनी म्हटले आहे की सोमवारी परळीत मोठा आठवडी बाजार भरतो. ग्रामीण भागातून हजारो नागरिक, महिला आणि शेतकरी आपल्या कुटुंबासह शहरात येतात. अशा वेळी दारूमुळे होणारे वादविवाद आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनतो. तसेच शुक्रवार हा दिवस मुस्लिम समुदायासाठी अत्यंत पवित्र मानला जातो. धार्मिक भावनांचा आदर करत आणि शहरात शांततापूर्ण वातावरण राहावे, यासाठी या दिवशी मद्यविक्री बंद असणे गरजेचे आहे. जर नगरपरिषदेने सोमवारी मांस विक्री बंद करण्याचा निर्णय घेतला असेल, तर त्याच धर्तीवर दारू विक्रीवर बंदी का घातली जाऊ शकत नाही? असा थेट सवाल बब्बू यांनी प्रशासनाला विचारला आहे. दारूमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत आणि सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या त्रासामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त आहेत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

शहरातील कायदा व सुव्यवस्था तसेच धार्मिक वातावरण टिकवून ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. सोमवारी आणि शुक्रवारी मद्यविक्री बंद ठेवल्यास महिलांची सुरक्षितता वाढेल आणि तरुणांना व्यसनाधीनतेपासून रोखण्यास मदत होईल. प्रशासनाने यावर तत्काळ अंमलबजावणी करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असेही सय्यद फारुख गणी (बब्बू), गटनेते, काँग्रेस यांनी म्हटले आहे.

गुरुवार, ३० एप्रिल रोजी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वसाधारण सभेत हे निवेदन सादर करण्यात आले. या सभेत मुख्याधिकारी आणि सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत या विषयावर जोरदार चर्चा झाली. आता प्रशासन या लोकहिताच्या मागणीवर काय निर्णय घेणार, याकडे संपूर्ण परळी शहराचे लक्ष लागले आहे.

# परळी नगर परिषदेच्या अग्निशमन दलाचा बोजवारा!

### 'रेझिंग' मॉल जळून खाक; ५०० मीटरवरूनही गाडी ४० मिनिटे उशिरा, नगरसेवक नितीन बागवाले आक्रमक; चौकशी व कारवाईची मागणी, आंदोलनाचा इशारा

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवर परिसरात बुधवारी (दि. २९) दुपारी लागलेल्या भीषण आगीत 'रेझिंग' या कपड्यांच्या मॉलचा अक्षरशः राखरांगोळी झाला. धक्कादायक बाब म्हणजे, घटनास्थळापासून अवघ्या ५०० मीटर अंतरावर असलेल्या नगर परिषदेच्या अग्निशमन केंद्राची गाडी तब्बल ४० ते ५० मिनिटे उशिराने पोहोचली. या गंभीर हलगर्जीपणामुळे व्यापाऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



राणी लक्ष्मीबाई टॉवर चौकातील गजबजलेल्या 'रेजिन लेडीज वेअर' या दालनात अचानक आग लागल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. नागरिकांनी तातडीने अग्निशमन विभागाला कळवले, मात्र प्रतिसादात झालेल्या विलंबामुळे आगीने रौद्ररूप धारण केले. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून अखेर थर्मल पॉवर स्टेशनच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. त्यांच्या तत्परतेमुळे आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले, पण तोपर्यंत मॉलमधील मोठ्या प्रमाणात माल जळून खाक झाला होता.

या निष्क्रियतेवर संतप्त प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे गटनेते तथा नगरसेवक नितीन बागवाले यांनी प्रशासनावर जोरदार हल्ला चढवला.

आपत्कालीन सेवा नागरिकांच्या सुरक्षेसाठी असते, मात्र परळी नगर परिषदेची यंत्रणा पूर्णपणे कोलमडली आहे. ५०० मीटर अंतरावर असताना अग्निशमन गाडी वेळेत पोहोचत नाही, ही अत्यंत गंभीर आणि लाजिरवाणी बाब आहे. हा प्रकार म्हणजे नागरिकांच्या जीवाशी व मालमत्तेशी थेट खेळ आहे, अशा शब्दांत त्यांनी प्रशासनाचा समाचार घेतला.

# पन्नास लाखांचे मंदिर, पण गाभाऱ्याला दरवाजा नाही! निष्काळजीपणामुळे श्रीरामांच्या मूर्तीचे वस्त्र जळाले !

पाटोदा । प्रतिनिधी


शहरातील प्रभू श्रीराम मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी तब्बल ५० लाख रुपयांचा निधी मंजूर होऊन नवीन मंदिर उभारण्यात आले. मात्र, कामाच्या दर्जाबाबत सुरुवातीपासूनच प्रश्नचिन्ह उपस्थित होत होते. गेल्या दोन वर्षांपासून भाविकांकडून सातत्याने करण्यात येणाऱ्या मागण्यांकडे संबंधित यंत्रणा आणि कंत्राटदाराने पूर्णतः दुर्लक्ष केल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे.

मंगळवारी दुपारच्या सुमारास मोठी दुर्घटना टळली. मंदिराच्या गाभाऱ्याला दरवाजा नसल्यामुळे अज्ञात व्यक्तीने पेटवलेल्या दिव्यामुळे प्रभू श्रीरामांच्या मूर्तीवरील वस्त्रांना आग लागली. यात कपडे जळून खाक झाले असून मूर्तीचा काही भाग काळवंडला. सुदैवाने ही आग वेळीच विझवण्यात आली, अन्यथा मोठे नुकसान झाले असते.

मंदिराचे पुजारी चंद्रकांत एकबोटे यांनी सांगितले की, गाभाऱ्याला दरवाजा नसणे आणि कंत्राटदार व अभियंत्यांची निष्काळजीपणा हीच या घटनेची मुख्य कारणे आहेत.

घटनेची माहिती मिळताच आमदार सुरेश धस यांनी तात्काळ पोलिसांना पाहणीचे आदेश दिले.

### पाटोद्यात राम भक्तांमध्ये संताप, जबाबदार दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी



त्यानुसार पाटोदा पोलीस ठाण्याचे एपीआय भाबड व त्यांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन तपास केला.

दरम्यान, ही माहिती सोशल मीडियावर व्हायरल होताच मोठ्या संख्येने रामभक्त मंदिरात जमा झाले. संतप्त भाविकांनी ५० लाखांच्या खर्चात साधा गाभाऱ्याला दरवाजा का नाही, असा जाब संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांना विचारला. दोषींवर कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. तसेच संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहितीही समोर आली.

या घटनेमुळे पाटोद्यातील मंदिरांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरातील प्रमुख मंदिरांमध्ये ना सीसीटीव्ही व्यवस्था आहे, ना अग्निसुरक्षा यंत्रणा. त्यामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडल्यास जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. भाविकांनी आरोप केला की, लाखो रुपयांचा निधी चांगल्या कामासाठी दिला जातो, मात्र कंत्राटदार आणि अभियंते निकृष्ट दर्जाचे काम करून केवळ आर्थिक स्वार्थ साधत आहेत. या प्रकारामुळे धार्मिक स्थळांच्या कामांमध्येही भ्रष्टाचार आणि निष्काळजीपणाचे वास्तव समोर आले आहे.

# उष्मघातापासून बचाव करण्याच्या सूचना

बीड । प्रतिनिधी

उष्माघाताची कारणे-उन्हामध्ये शारिरीक श्रमामुळे,उन्हात मजुरीचे कामे फार वेळ करणे,कारखान्यांचे बॉयलर रुममध्ये व काच कारखान्यात काम करणे,जास्त तापमानाच्या खोलीत काम करणे.घट्ट कपड्यांचा वापर करणे.उष्णतेशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संबंध येणे ही उष्माघात होण्याची कारणे आहेत.लग्न उत्सव, यात्रा याठिकाणी अति उन्हात थांबणे व फिरणे,



उष्माघाताचे लक्षणे-

चक्कर येणे, उलटी व मळमळ होणे,शरीराचे तापमान खूप वाढणे,पोटात कळा येणे,शरीरातील पाणी कमी होणे,त्वचा कोरडी होणे,डोके दुखणे.बेशुद्ध होणे अथवा अस्वस्थ होणे,

जोखीम गट- ५ पेक्षा कमी वयाची बालके ६५ पेक्षा जास्त वय असणारे जेष्ठ नागरिक,अधिक कष्टाची सवय नसणारी व्यक्ती. धूम्रपान, मद्यपान करणारी व्यक्ती,मुत्रपिंड,-हदयरोग, यकृत,त्वचा विकार,लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब इत्यादी रुग्ण. अति आद्रता, वातानुकुलनाचा अभाव, शेतकाम, कारखान्यातील काम करणारे कामगार, उष्णतेशी संबधित व्यवसाय करणारे व्यक्ती.

उष्णतेपासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी काय करावे-

पुरेसे पाणी प्या, तहान लागलेली नसली तरी दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी प्या. जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे.

घराबाहेर पडतांना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करा. दुपारी १२ ते ३ वाजेच्या दरम्यान घराबाहेर जाणे टाळा. सूर्य प्रकाशापासून वाचण्यासाठी घरातील पडदे आणि झडपांचा वापर करा. उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडीओ, टीव्ही किंवा

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मेट्रोसाठी वाढवलेल्या एफएसआय धोरणावर सवाल; मेधा कुलकर्णींचा प्रशासनाला जाब

**पुणे । प्रतिनिधी**

सार्वजनिक वाहतुकीला पर्याय म्हणून पुण्यात मेट्रो आणली आणि मेट्रो चालावी म्हणून मेट्रोमार्गावर चार चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) देऊन गर्दी वाढवली. हे धोरण शहरीकरण, पर्यावरणासाठी व्यवहार्य आहे का? पौड फाटा-चतु:शृंगी रस्ता जास्त वापरला जाणार नाही, असे तज्ज्ञ सांगत असताना त्या रस्त्याचा आग्रह का धरायचा?

शहरात वारंवार येणाऱ्या पुरामागे सदोष नदीकाठ विकास कार्यक्रम, नदीप्रवाहातील अतिक्रमणे आहेत का? असे मुद्दे चर्चेला आले पाहिजेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी शहराच्या व्यापक हितासाठी काम करणे आवश्यक आहे, अशा शब्दांत खासदार मेधा कुलकर्णी यांनी लोकप्रतिनिधींना ठणकावले. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था शताब्दी संवाद मालिकेअंतर्गत 'विकसित महाराष्ट्र २०४७ : शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी मार्गदर्शक दिशा' या कार्यशाळेचे उद्घाटन खासदार कुलकर्णी यांच्या हस्ते बुधवारी करण्यात



आला. स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे महासंचालक जयराज फाटक, उपसंचालक रवी रंजन गुरू आदी या वेळी उपस्थित होते.

खा. कुलकर्णी म्हणाल्या, 'पुणे शहरातील आत्ताच्या लोकसंख्येसाठी सार्वजनिक वाहतूकव्यवस्था बळकट करणासाठी मेट्रो आणली. मेट्रोसाठी म्हणून मेट्रोमार्गाभोवती चार 'एफएसआय' देऊन गर्दी वाढवली. हे धोरण शहरीकरण, पर्यावरणासाठी व्यवहार्य आहे का? पौड फाटा-चतु:शृंगी रस्त्याचा वापर फार होणार नाही, असे त्या क्षेत्रातील तज्ज्ञ सांगत असताना या रस्त्याचा आग्रह आपण का धरायचा? शहरात पूर येण्याच्या समस्येमागे सदोष नदीकाठविकास कार्यक्रम, नदीप्रवाहातील अतिक्रमणे आहेत का? असे मुद्दे चर्चिले गेले पाहिजेत. पावसाचे पाणी शहरातच जमिनीत मुरवता येईल का? असे पदपथांचे, पावसाळी पाण्याच्या वाहिन्यांचे प्रारूप तयार करता येईल.

...तरच शहरांत शाश्वत विकास होईल

रस्ते बांधताना सेवा वाहिन्या एका बाजूला डक्टमध्येच असणे अपेक्षित असते. तो डक्ट उघडला की काम होईल आणि रस्ते खोदावे लागणार नाहीत. जंगली महाराज रस्त्यावर सेवा वाहिन्या बाजूला असल्याने हा रस्ता खोदावा लागत नाही. सेवा वाहिन्यांच्या कामासाठी रस्ते खोदावे लागत असतील, तर त्याला स्मार्ट कसे म्हणायचे? शहरे वाढत असताना व्यापक विचार करून काय योग्य? हा सर्व विचार केल्यास शहरांत शाश्वत विकास होईल, असेही खासदार कुलकर्णी यांनी सांगितले.

# महापौर बंगल्यात १९ झाडांची कत्तल; चौकशीचे आदेश

पुणे: महापौर बंगल्याच्या आवारात १९ वृक्षांची करण्यात आलेली 'कत्तल' आता महापालिका प्रशासनाला भोवण्याची चिन्हे आहेत. यासंदर्भात दैनिक 'पुढारी'मध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची गंभीर दखल घेत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. वॉर्ड ऑफिस स्तरावर माहिती घेऊन याप्रकरणी तातडीने खुलासा करावा आणि दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असे फर्मान आयुक्तांनी दिल्याने वृक्ष संवर्धन समितीमधील अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

पुण्याच्या पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी महापालिका ५० लाख झाडे लावण्याचे नियोजन करत आहे. मात्र, दुसरीकडे महापौर बंगल्यातील झाडे खराब झाल्याचे व त्यांच्यावर कीड पडल्याची कारणे देत १९ डेरेदार वृक्षांची फांद्या छाटणीच्या नावाखाली कत्तल करण्यात आली. महापौर बंगल्यातील निलगिरी, पिंपळ, आंबा, जांभूळ, चिंच, उंबर अशा १९ वृक्षांची फांद्या छाटणीच्या नावाखाली बुंध्यापासून तोडण्यात आली आहे.

१२ मार्चला वृक्ष संवर्धन विभागाचे हॉर्टीकल्चर मिस्त्री रवींद्र कांबळे यांनी प्रस्ताव मांडला आणि दुसऱ्याच दिवशी १३ मार्चला सहायक आयुक्तांनी त्याला मंजुरीही दिली. विशेष म्हणजे, ज्या विभागावर वृक्ष जोपासण्याची जबाबदारी आहे, त्याच विभागाने स्वतःच पुढाकार घेऊन 'धोका' असल्याचे भासवून ही कारवाई केल्याने संशयाची सुई प्रशासनाकडे वळली आहे. या घटनेचे वृत्त देऊन या प्रकरणाला वाचा फोडली होती.




याची दखल घेत वृक्षप्रेमींनी देखील प्रशासनाला धारलेवर धरले होते. प्रत्यक्षात भवन विभागाने अर्ज करणे अपेक्षित असताना वृक्ष संवर्धन विभागाने दाखवलेली ही 'तत्परता' नेमकी कोणासाठी होती? असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता. याबाबत भवन विभागाचे प्रमुख बिपीन शिंदे यांना विचारले असता त्यांनी असा कोणताही आदेश दिले नसल्याचे सांगितले.

# बुद्ध पौर्णिमेला पुण्यात 'मचाण गणना'; निसर्गप्रेमींसाठी खास संधी

**पुणे । प्रतिनिधी**

निसर्गाची अनाकलनीय लय, जंगलातील रात्रीची ती गूढ शांतता आणि चंदेरी चांदण्यांत पाणवठ्यावर तहान भागविण्यासाठी येणाऱ्या वन्यजीवांचे दर्शन... निसर्गप्रेमींसाठी ही केवळ एक कल्पना नसून एक थरारक अनुभव असतो. हाच अनुभव यंदाच्या बुद्ध पौर्णिमेला प्रत्यक्षात अनुभवता येणार आहे.

पुणे वन्यजीव विभागामार्फत ३० एप्रिल रोजी जिल्ह्यातील विविध अभयारण्ये आणि वनपरिक्षेत्रांत 'निसर्गानुभव' (मचाण गणना) उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. वन्यजीव विभागाच्या पुणे कार्यालयाने नियोजन केल्याप्रमाणे रेहेकुरी, करमाळा, नान्नज, सुपे, भीमाशंकर आणि शिरूर यांसारख्या



वनक्षेत्रांमधील एकूण २८ पाणवठ्यांवर मचाणांची सोय करण्यात आली आहे. निसर्गप्रेमी, स्वयंसेवी संस्था आणि विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी करून घेण्यात येणार आहे. एका मचाणावर जास्तीत जास्त दोनच व्यक्तींना बसण्याची परवानगी असेल. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर निवडीची प्रक्रिया पार पडणार आहे.

केवळ गणना न राहता, मानवाचे निसर्गाशी नाते अधिक घट्ट व्हावे आणि वन्यजीव संरक्षणाबद्दल जनजागृती व्हावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. जिल्ह्यातील एकूण २८ मचाणे/पाणवठ्यांच्या ठिकाणी ही पाहणी करण्यात येणार आहे. रेहेकुरी (काळवीट अभयारण्य) येथे तीन ठिकाणी, करमाळा येथे तीन ठिकाणी, नान्नज (माळढोक अभयारण्य) येथे तीन ठिकाणी, सुपे (मयूरेश्वर अभयारण्य) येथे तीन ठिकाणी, भीमाशंकर अभयारण्य १ आणि २ येथे ६ ठिकाणी, ताम्हिणी आणि शिरूर/निरगुडसर येथे प्रत्येक ठिकाणी ३, तर श्रीगोंदा येथे ४ ठिकाणी व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती विभागीय वन अधिकारी संदीप गवारे यांनी दिली.

पुणे वन्यजीव विभागांतर्गत येणाऱ्या विविध वनपरिक्षेत्रांमधील प्राणिगणनेची अधिकृत आकडेवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे. बुद्ध पौर्णिमेच्या लख्ख प्रकाशात मचाणावरून करण्यात आलेल्या या निरीक्षणादरम्यान एकूण १,४२८ वन्यप्राण्यांचे दर्शन घडले आहे. विभागातील ९ प्रमुख वनपरिक्षेत्रांमध्ये ही गणना पार पडली. काळवीट आणि रानडुकरांच्या संख्येत मोठी वाढ पाहायला मिळत आहे.

# राज्यात ३,५०० कोटींची एफआरपी थकीत; राजू शेट्टींचा कारवाईचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील अनेक साखर कारखान्यांनी उसाची रास्त आणि किफायतशीर किंमत (एफआरपी) शेतकऱ्यांना दिल्याची बनावट माहिती साखर आयुक्तालयास पाठवली आहे. राज्यात अजूनही जवळपास ३,५०० कोटी रुपयांची एफआरपीची रक्कम थकीत असून, कारखानानिहाय तातडीने चौकशी करून संबंधितांवर जप्तीची कारवाई करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष राजू शेट्टी यांनी साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्याकडे समक्ष चर्चेत केली.

साखर आयुक्तालयात बुधवारी (दि. २९) सकाळी त्यांनी डॉ. कोलते यांची भेट घेतली. त्या वेळी साखर संचालक (प्रशासन) डॉ. केदारी जाधव, सहसंचालक (अर्थ) सचिन रावल आणि



शेतकरी उपस्थित होते. त्या वेळी चर्चेत त्यांनी साखरेच्या विविध प्रलंबित विषयांवर चर्चा करून ते प्रश्न सोडविण्याची मागणी केली. थकीत एफआरपीप्रश्नी संबंधित साखर कारखान्यांवर महसुली वसुली प्रमाणपत्रानुसार (आरआरसी) जप्तीची कारवाई सुरू करावी, असा आग्रह शेट्टी यांनी चर्चेत धरला. कारण, राज्यातील साखर कारखान्यांचा २०२५-२६ चा ऊस गाळप हंगाम संपून जवळपास अडीच महिने झाले आहेत. तरीही कारखान्यांनी संपूर्ण रक्कम न दिल्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे.

त्यामुळे साखर आयुक्तांनी साखर सहसंचालक व लेखापरीक्षक यांच्यामार्फत थकीत एफआरपीबाबत कारखानानिहाय तातडीने चौकशी करून कारवाई करावी. चालू वर्षी बाजारांमध्ये साखरेसह सर्व उपपदार्थांना चांगले भाव मिळाले आहेत. मात्र, साखर कारखानदारांनी केंद्र सरकारकडून अनुदान किंवा पॅकेज मिळविण्यासाठी शेवटच्या दीड महिन्यात गाळप झालेल्या उसाची एफआरपी अदा केलेली नाही. याचा फटका राज्यातील लाखो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसला असून, शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. राज्य सरकार साखर कारखानदारधार्जिणे झाले असल्याने कारवाईचा फार्स केला जात असल्याचा आरोप त्यांनी या वेळी केला. साखर आयुक्त डॉ. कोलते यांनी येत्या आठवडाभरात राज्यातील साखर कारखान्यांच्या थकीत एफआरपीबाबतची वास्तव माहिती घेऊन बनावट माहिती दिली असेल त्यांची चौकशी करून कारवाईचा बडगा उगारला जाईल, अशी [illegible]

# वीर मंदिरात महिलांना गाभाऱ्यात प्रवेश; पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर निर्णय

पुरंदर । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र वीर (ता. पुरंदर) येथील श्रीनाथ म्हस्कोबा व माता जोगेश्वरी यांच्या मंदिरातील मुख्य गाभाऱ्यात अखेर पोलिस बंदोबस्तात आणि विश्वस्तांच्या उपस्थितीत प्रवेश देण्यात आला. गेले काही महिने येथे महिलांना प्रवेशबंदी करण्यात येत होती. त्यानुषंगाने दै. 'पुढारी'मध्ये वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. त्याची दखल घेऊन प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही केली आहे.



सासवडचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कुमार कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार संदीप पवार यांच्या टीमने वीर देवस्थान मंदिराला भेट दिली. देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त, पुजारी व इतर उपस्थित ग्रामस्थ यांच्याशी मंदिरात महिला प्रवेशाच्या अनुषंगाने कायदेशीर चर्चा केली व त्याच क्षणी उपस्थित असणाऱ्या महिलांना देवाच्या मुख्य गाभाऱ्यामध्ये प्रवेश देण्यात आला, तसेच पुजाऱ्यांनीही महिलांना गाभाऱ्यात येण्यापासून रोखू नये, अशा प्रकारच्या सूचना देवस्थान ट्रस्ट व पोलिस प्रशासनाने केल्या आहेत.

दरम्यान, ने याची दखल घेऊन या महिलांना दुय्यम वागणूक देणाऱ्या प्रश्नाला वाचा फोडल्यामुळे अनेक महिला भाविकभक्तांनी समाधान व्यक्त केले आहे. या वेळी देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त सुनील धुमाळ, अमोल धोंडीबा धुमाळ, माजी सरपंच भगवान वाघ, विराज धुमाळ, प्रसाद गुरव, विजू गुरव, पोलिस हवालदार संदीप पवार तसेच महिला भाविकभक्त उपस्थित होत्या.

# लोणावळ्यातील वलवण धरणात बुडून तरुणाचा मृत्यू

पिंपरी चिंचवड

लोणावळ्यातील वलवण धरणात तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पोहण्याचा मोह जीवावर बेतला आहे. काल दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास कुरवंडे गाव येथील योगेश पालवे हा तरुण वलवण धरणाच्या पाण्यात पोहण्यास उतरला होता. पण पाण्यातील खोलीचा अंदाज न आल्याने त्याचा बुडून मृत्यू झाला.




दरम्यान, घटनेची माहिती मिळताच काल रात्री लोणावळा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. त्यानंतर आज लोणावळा पोलीस आणि शिवदुर्ग रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाली. यानंतर रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी स्कूबा किटच्या सहाय्याने पाण्यात उतरून शोधकार्य सुरू केले, तर बाहेर शोध पथकाने दोरीच्या साहाय्याने मदत केली. सुमारे अर्धा ते पाऊण तास चाललेल्या शोधमोहीमेनंतर अखेर मृतदेह शोधण्यात यश आले. मृतदेह पाण्याबाहेर काढून पुढील कायदेशीर कारवाईसाठी लोणावळा शहर पोलीसांकडे सुपूर्द करण्यात आला.

# पुण्यात आरएमसी प्रदूषणावर कारवाई; आयुक्तांचा प्रत्यक्ष पाहणी दौरा

पुणे: शहरातील रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पांमुळे वाढलेल्या प्रदूषणाच्या तक्रारींची दखल घेत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्वतः पुढाकार घेतला आहे. पुढील आठवड्यात ते महापालिका हद्दीतील विविध आरएमसी प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करणार असून, या दौऱ्यात महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारीही सहभागी होणार आहेत.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांवर पाहणीनंतर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. वडगाव खुर्द, धायरी, बावधन, लोहगाव, उंड्री, शेवाळवाडी आदी भागांत मोठ्या प्रमाणात आरएमसी प्रकल्प उभे राहिले आहेत. या प्रकल्पांमुळे परिसरात धूळ व प्रदूषणाचे प्रमाण वाढले



असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. काही ठिकाणी सिमेंटयुक्त राडारोडा व रासायनिक स्लरी थेट मुठा नदीत सोडली जात असल्याने नदीच्या पाण्याचा रंग बदलल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

दरम्यान, आरएमसी प्रकल्पांवरील कारवाईचा मुद्दा गेल्या काही दिवसांत चांगलाच गाजला आहे. लोहगाव-खांदवेनगर परिसरातील सात प्रकल्पांवर महापालिकेने कारवाई केली होती. त्यानंतर वडगाव खुर्द येथील प्रकल्पांवर कारवाईचे नियोजन असतानाच ती माहिती लीक झाल्याने कारवाई रद्द केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, संबंधित अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

# पुण्यातील २३ गावांचा विकास आराखडा तयार करण्यास सुरुवात

पुणे । प्रतिनिधी

महापालिकेत समाविष्ट २३ गावांचा प्रारूप विकास आराखडा (डीपी) तयार करण्यासंबंधीची प्रक्रिया सुरू केली. या आराखड्याचा इरादा जाहीर करणे आणि त्यासाठी नगर नियोजन अधिकार्याची नेमणूक करणे यासाठीच्या मंजुरीचा प्रस्ताव प्रशासनाने शहर सुधारणा समितीपुढे मंजुरीसाठी ठेवला आहे.



शहर सुधारणासह मुख्य सभेच्या मंजुरीनंतर त्यावर कार्यवाही सुरू होणार आहे. हद्दीलगतच्या २३ गावे जुन २०२१ मध्ये महापालिकेत समाविष्ट करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. मात्र, ही गावे पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीत असतानाच त्यांचा प्रारूप आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू झाली होती. त्यामुळे या गावांचा आराखडा पीएमआरडीएकडून तयारही करण्यात आला होता. मात्र, त्याबाबत प्रचंड तक्रारी आल्याने शासनाने हा आराखडाच रद्द केला होता. त्यामुळे आता शासनाच्या निर्देशानुसार महापालिका हा आराखडा तयार करणार आहे. त्यासाठी नगर नियोजन अधिकारी म्हणून शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांच्या नेमणुकीचा प्रस्ताव शहर सुधारणा समितीकडे मंजुरीसाठी पाठविला आहे.

# चतु:श्रृंगी पोलिसांची मोठी कारवाई ! प्रतिबंधित गुटख्याचा मोठा साठा जप्त

पुणे । प्रतिनिधी

चतु:श्रृंगी पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने गोखलेनगर परिसरात धडक कारवाई करत बेकायदेशीररित्या साठवून ठेवलेला प्रतिबंधित तंबाखूजन्य गुटखा व पानमसाल्याचा मोठा साठा जप्त केला. या कारवाईत एक आरोपीला अटक करण्यात आली असून तब्बल १९ लाख ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २७ एप्रिल रोजी गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलिंग सुरू असताना चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनच्या पथकाला माहिती मिळाली की, गोखलेनगर येथे एका ठिकाणी विनापरवाना प्रतिबंधित तंबाखूजन्य गुटखा साठवून त्याची विक्री केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली व खात्री करून छापा टाकला. या कारवाईदरम्यान अमर नंदु पन्हाळकर ( ३७, रा. १०१, जनवाडी जनता वसाहत, पुणे) याला ताब्यात घेण्यात आले. तपासात त्याच्याकडे विक्रीसाठी साठवून ठेवलेला मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटखा व पानमसाला आढळून आला. पोलीसांनी त्याच्या ताब्यातून १३ लाख ५१ हजार १५० रुपये किंमतीचा तंबाखूजन्य माल तसेच ६ लाख रुपये किंमतीचा टेम्पो असा एकूण १९ लाख ५१ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक अनिकेत पोटे हे करीत आहेत.

ही कारवाई अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) मनोज पाटील, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-४) चिलुमुला रजनीकांत, सहायक पोलीस आयुक्त (खडकी विभाग) विठ्ठल दबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) आश्विनी ननावरे यांच्या सूचनेनुसार सहायक पोलीस निरीक्षक अनिकेत पोटे, पोलीस अंमलदार इरफान मोमीन, बाबुलाल तांदळे, श्रीकांत वाघवले व शिर्के यांनी केली.

# पुण्यात मध्यरात्री गॅस गळतीची घटना ! अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील मार्केट यार्डातील गंगाधाम-बिबवेवाडी रस्त्यावर मध्यरात्री मोठा अनर्थ होता होता टळला आहे. याठिकणी असलेल्या एका रासायनिक कंपनीतून मध्यरात्री गॅस गळती झाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी त्वरीत घटनास्थळी धाव घेऊन गॅस गळती रोखल्याने अनर्थ टळला.

रासायनिक कंपनीतून गॅस गळती झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना श्वसनाचा  झाल्याने त्यांना तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेत अग्निशमन दलाचे एक अधिकारी आणि जवानाला त्रास झाला. त्यांनाही रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

गंगाधाम रस्त्यावर आईमाता मंदिरासमोर ही रासायनिक कंपनी आहे. या कंपनीतून मध्यरात्री मोठ्या प्रमाणावर गॅस गळती सुरू झाली. गॅस गळती झाल्यानंतर परिसरातील २४ नागरिकांना त्रास जाणवू लागला. डोळे चुरचुरणे, श्वसनाचा त्रास जाणवल्याच्या तक्रारी करण्यात आला.

गॅस गळतीची घटना समजल्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. सुरक्षाविषयक उपकरणे परिधान करुन आधिकारी आणि जवान कंपनीत शिरले. त्यांनी तातडीने गॅस गळती रोखली.

नागरिकांना त्रास जाणवू लागल्याची माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन दलाचे अधिकारी आणि जवानांनी तातडीने नागरिकांना ससून रुग्णालयात दाखल रुग्णवाहिकेतून दाखल केले. गॅस गळतीमुळे २४ नागरिकांना त्रास झाला. अग्निशमन दलाचे एक अधिकारी आणि जवान यांनाही त्रास झाला. त्यांना ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुदैवाने या घटनेत कोणी गंभीर जखमी झाले नाही', अशी माहिती अग्निशमन दलाचे मुख्य अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांनी दिली. अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पाच अधिकारी आणि ३० जवान मदतकार्यात सहभागी झाले होते.